19 Nov 2026_Layout 1 11/18/2026 10:26 PM Page 1

नोव्हेंबर / November
गुरूवार / Thursday
दि.१९ / Dt: 19
२०२६ / 2026

महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगमित्र

सत्य | निष्पक्ष | निर्भीड | सर्वसमावेशक

आजचा अंक ६ पाने Pages 6

किंमत ३ रूपये Price 3 rupees

Jagmitra2010@gmail.com

● मा.संपादक : कृष्णा कडबाने 7030908787 ● निवासी संपादक : मकरंद जहागीरदार 9422216061, 9371591760 ● कार्यकारी संपादक : शेख बिलाल 9422404740

www.jagmitra.com

● बीड/Beed ● वर्ष १७ वे/Year 17 ● अंक २८/Issue 28 ● आरएनआय नं.एमएचएमएआर/२०११/३८८१४ /RNI.No.MAHMAR/2011/38814

महसूल मंत्री साहेब; कंत्राटी भरती की लक्ष्मीदर्शन?

माहिती अधिकार कायदा पायदळी; जाधव, ठेंगे आणि बागडे यांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह!



बावनकुळे साहेब, या भ्रष्ट अधिकाऱ्यांना वेसण घालणार का?

नियमाप्रमाणे भरती झाली असेल तर माहिती द्यायला घाबरता कशाला? हाच खरा सवाल आहे. या भरतीमागे मोठी आर्थिक देव-घेवाण झाली, प्रत्येक ऑपरेटरकडून लाखो रुपये उकळले गेले, असा थेट संशय आता बळावला आहे. पारदर्शक भरतीचा आव आणणारे हे अधिकारीच जर माहिती दडपत असतील, तर नक्कीच डाळ में काला नहीं, पूरी दाल ही काली है! महसूल विभागाची अब्रू या अधिकाऱ्यांमुळे वेशीवर टांगली गेली आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी याची तात्काळ गंभीर दखल घ्यावी. ही फक्त माहिती नाकारण्याची बाब नाही, तर हा शासनाची फसवणूक करून केलेला संघटित भ्रष्टाचार आहे.

फाईल्स गायब झाल्या तर जबाबदार कोण? बोगस ऑपरेटर्सच्या हाती शेतकऱ्यांचे सातबारा आणि फेरफार!

बावनकुळे साहेब, बीडच्या मनमानी अधिकाऱ्यांना वेसण कधी? सुनावणीनंतरही माहिती देण्यास टाळाटाळ!

नियमाप्रमाणे भरती झाली असेल तर घाबरता कशाला?

सवाल सरळ आहे. जर भरती पारदर्शक आणि नियमाप्रमाणे झाली असेल, तर माहिती दडवण्याचे कारण काय? यादी आणि आदेशाची प्रत द्यायला एवढी लाज का वाटते? याचाच अर्थ, या कंत्राटी भरतीत मोठ्या प्रमाणावर पैशांची देवाण-घेवाण होऊन पोरांना बेकायदेशीर-रपणे घुसवले गेले आहे, आणि हाच घोटाळा लपवण्यासाठी माहिती दाबली जात आहे.

फाईल्स गायब झाल्या तर जबाबदार कोण? शेतकऱ्याच्या जमिनीचा सौदा होणार का?

सगळ्यात गंभीर प्रश्न हाच आहे. ज्या ऑपरेटर्सच्या नियुक्तीचा आदेशच प्रशासन दाखवू शकत नाही, ते बेकायदेशीर ऑपरेटर्स कोणत्या अधिकाराखाली सरकारचे गोपनीय दस्तऐवज, शेतकऱ्यांच्या जमिनीच्या फाईल्स, सातबारा, फेरफार हाताळत आहेत? उद्या एखाद्या गरीब शेतकऱ्याची फाईल गायब झाली, रेकॉर्डमध्ये फेरफार झाला, गोपनीय माहिती विकली गेली, मोठा जमीन घोटाळा झाला तर याला जबाबदार कोण? तेव्हा हेच ठेंगे, बागडे आणि जाधव मॅडम हात वर करून मोकळे होणार का?या बेकायदेशीर, बोगस आणि पैशाच्या जोरावर घुसवलेल्या ऑपरेटर्सना पाठीशी घालणारे हेच अधिकारी उद्या होणाऱ्या प्रत्येक घोटाळ्याला जबाबदार असतील. या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करून बडतर्फ का करू नये? असा संतप्त सवाल आता बीडच्या जनतेतून विचारला जात आहे.

बीड/जगमित्र न्यूज

बीडच्या उपविभागीय अधिकारी कार्यालयात सध्या कायद्याचे राज्य सुरू आहे की अधिकाऱ्यांची मनमानी, असा संतप्त सवाल सामान्य नागरिक आणि माहिती अधिकार कार्यकर्त्यांकडून उपस्थित केला जात आहे. जानेवारी २०२५ ते मे २०२६ या कालावधीत कार्यालयात नियुक्त करण्यात आलेल्या कंत्राटी ऑपरेटर्सच्या भरतीत मोठा आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा संशय बळावला असून, हा भ्रष्टाचार दडपण्यासाठी चक्क प्रथम अपिलीय अधिकारी, कविता जाधव आणि जनमाहिती अधिकारी, शशिकांत ठेंगे यांच्याकडून माहिती अधिकार कायदा पायदळी तुडवला जात असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. एका माहिती अधिकार कार्यकर्त्याने १५ मे २०२६ रोजी बीड उपविभागीय अधिकारी कार्यालयात अर्ज दाखल करून खालील माहिती मागवली होती. जानेवारी २०२५ ते मे २०२६ या कालावधीत एकूण किती कंत्राटी ऑपरेटर्सची नियुक्ती करण्यात आली? नियुक्त केलेल्या सर्व ऑपरेटर्सच्या नावांची यादी. ही भरती कोणत्या बाह्यस्त्रोत कंपनीमार्फत किंवा शासन निर्णयाद्वारे झाली, त्या आदेशाची छायांकित प्रत. माहिती कायद्यानुसार ३० दिवसांत माहिती देणे बंधनकारक असतानाही प्रशासनाने जाणीवपूर्वक वेळकाढूपणा केला. अखेर २२ जून २०२६ रोजी प्रथम अपील दाखल करण्यात आले. अपिलाची सुनावणी होऊनही दोन महिने उलटूनही अद्यापपर्यंत अर्जदाराला माहिती देण्यात आलेली नाही. माहिती मागितल्यानंतर कार्यालयातील जबाबदार अधिकारी एकमेकांकडे बोट दाखवून अर्जदाराची दिशाभूल करत आहेत. जनमाहिती अधिकारी शशिकांत ठेंगे हे सहाय्यक जनमाहिती अधिकारी निलेश बागडे यांच्याकडे बोट दाखवतात; तर निलेश बागडे हे पुन्हा ठेंगे यांच्याकडे किंवा प्रथम अपिलीय अधिकारी कविता जाधव यांना भेटण्याचा सल्ला देतात. वरिष्ठ आणि कनिष्ठ अधिकाऱ्यांच्या या टोलवाटोलवीमुळे कार्यालयात ''आंधळं दळतंय आणि कुत्रं पीठ खातंय'' अशीच परिस्थिती निर्माण झाली आहे. नियमाप्रमाणे आणि पारदर्शकपणे भरती झाली असेल, तर मग माहिती देण्यास अधिकारी इतके का घाबरत आहेत? कंत्राटी ऑपरेटर्सच्या या भरतीत मोठ्या प्रमाणावर आर्थिक देवाणघेवाण होऊन मोठा घोटाळा झाला असल्याचा थेट संशय आता व्यक्त केला जात आहे. हीच अनियमितता लपवण्यासाठी माहिती दडपली जात असल्यामुळे महसूल विभागाची अब्रू वेशीवर टांगली जात आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी लक्ष घालून अशा भ्रष्ट बेजबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई केली पाहिजे जनतेची मागणी.

ऊस उत्पादक शेतकरी, सभासदांचे प्रश्न सोडविण्यासाठी फुलचंदराव कराड मैदानात

ओंकारने दर जाहिर करुन एकरकमी पैसे द्यावेत, वैद्यनाथच्या सभासदांना पुर्वीच्या सवलती द्याव्यात

परळी वैजनाथ/प्रतिनिधी

सध्या मराठवाड्यातील शेतकरी मोठ्या आर्थिक संकटातून जात असताना परळी मतदार संघातील ऊस उत्पादक शेतकर्यांचे अनेक प्रश्न प्रलंबित आहेत.हे सर्व प्रश्न सोडविण्यासाठी शिवसेना शिंदे गटाचे महाराष्ट्र राज्य समन्वयक फुलचंदराव कराड मैदानात उतरले असुन ओंकार शुगर युनिट नं.८ ने चालु गळीत हंगामासाठी दर जाहीर करुन पैसे एकरकमी द्यावेत, वैद्यनाथ साखर कारखाना



उभारणीसाठी पदरमोड करुन शेअर्स घेतलेल्या सभासद शेतकऱ्यांना पुर्वी प्रमाणे मिळणाऱ्या सवलती,सुविधा देण्यात याव्यात या प्रमुख मागण्यांसह इतर मागण्यांसाठी पांगरी येथील ओंकार शुगरवर समर्थकांसह धडक मारत मागण्यांचे निवेदन दिले.कारखाना प्रशासनाबरोबर शेतकऱ्यांच्या या प्रश्नाबाबत चर्चा करुन हे प्रश्न सोडविले नाही तर शेतकर्यांना सोबत घेवुन आंदोलन छेडण्याचा इशारा दिला. यावेळी परळी (पान २ वर)

खुनाचा प्रयत्न करणाऱ्या फरार आरोपीस परळी ग्रामीण पोलिसांकडून अटक

परळी वैजनाथ/प्रतिनिधी

परळी तालुक्यातील लोणारवाडी येथे गायराण जमिनीच्या वादातून एका व्यक्तीवर चाकूने वार करून खुनाचा प्रयत्न केल्याच्या गंभीर गुन्ह्यातील फरार आरोपीस परळी ग्रामीण पोलिसांनी अटक केली आहे. अशोक उर्फ काका उत्तम वंजारी (वय ४२, रा. शिवाजीनगर, परळी वैजनाथ) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. दिनांक १८ नोव्हेंबर २०२६ रोजी शिवाजीनगर, परळी येथून पोलिसांनी त्यास ताब्यात घेतले.

गायराण जमिनीच्या वादातून केला चाकूने हल्ला

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दिनांक १६ ऑक्टोबर २०२६ रोजी रात्री नामदेव शिवाजी वंजारे (वय ४५, रा. लोणारवाडी) हे आपल्या घरी असताना आरोपी अशोक उर्फ काका वंजारी हा पल्सर मोटारसायकलवरून लोणारवाडी येथे आला. फिर्यादीच्या ताब्यातील गायराण जमीन आपली असल्याचा दावा करीत त्याने फिर्यादीच्या वडिलांसोबत वाद घातला. त्यावेळी फिर्यादीने आरोपीची समजूत काढली. मात्र, त्यानंतर मध्यरात्री साडेबारा वाजण्याच्या सुमारास आरोपी पुन्हा घटनास्थळी आला. गायराण जमिनीच्या कारणावरून फिर्यादीसोबत वाद घालत त्याने जिवे मारण्याच्या उद्देशाने जवळील चाकूने फिर्यादीच्या छातीच्या उजव्या बाजूस वार केला. या हल्ल्यात फिर्यादी गंभीर जखमी झाले. या प्रकरणी परळी ग्रामीण पोलीस ठाण्यात दिनांक १७ ऑक्टोबर २०२६ रोजी गुन्हा रजिस्टर क्रमांक ५१७/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम १०९(१), ११(२), ३५१(२), ३५२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

एक महिन्यापासून आरोपी होता फरार

सदर गुन्ह्याचा तपास पोलीस (पान २ वर)

पंधरा दिवसांपासून तहसील कार्यालयात प्रस्तावावर हालचालींना वेग

तहसीलदारांच्या स्वाक्षरीनंतर पंचायत समितीकडे आदेश सुपूर्द

धारूर/अतूल शिनगारे

तालुक्यातील दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता पाणीटंचाईवर मात करण्यासाठी पंचायत समितीने तहसील कार्यालयाकडे पाठविलेले विहीर आणि बोअर अधिग्रहणाचे प्रस्ताव अखेर मंजूर करण्यात आले आहेत. तब्बल पंधरा दिवसांपासून मंजुरीच्या प्रतीक्षेत असलेल्या प्रस्तावांवर बुधवारी (दि. १८) तहसीलदार श्रीकांत निळे यांनी स्वाक्षरी केली. त्यानंतर २९ अधिग्रहण प्रस्तावांचे मंजुरी आदेश पंचायत समिती विभागाकडे सादर करण्यात आले. (पान २ वर)



वाघोलीच्या सरपंचांना पदावरून अपात्र घोषित

५.८१ लाखांच्या विकासकामांत अनियमितता; अपहाराची रक्कम व्याजासह वसूल करण्याचे आदेश

धारूर/अतूल शिनगारे

धारूर तालुक्यातील वाघोली येथील ग्रामपंचायतीच्या विकासकामांमध्ये आर्थिक अनियमितता आणि निधीचा अपहार केल्याप्रकरणी सरपंच सोजरबाई अंबादास गायकवाड यांना विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी सरपंचपदावरून अपात्र घोषित केले आहे. महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ च्या कलम ३९ (१) अन्वये ३ नोव्हेंबर रोजी हा महत्त्वपूर्ण निर्णय देण्यात आला. तसेच अपहार व आर्थिक अनियमिततेची रक्कम सरपंच आणि तत्कालीन ग्रामपंचायत अधिकाऱ्यांकडून व्याजासह वसूल करण्याचे आदेशही दिले आहेत.

वाघोली येथील ग्रामपंचायतीमध्ये १५ व्या वित्त आयोगाच्या निधीतून विविध विकासकामे करताना अनियमितता झाल्याची तक्रार सिद्धार्थ मोतीराम गायकवाड यांनी ११ जून २०२४ रोजी पंचायत समिती धारूरच्या गटविकास अधिकाऱ्यांकडे केली होती. त्यानंतर चौकशी होऊन प्रकरण जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे गेले. त्यांनी सादर केलेल्या चौकशी अहवालात ३ लाख २ हजार रुपयांच्या कामांमध्ये अनियमितता आणि २ लाख ७९ हजार २१४ रुपयांच्या निधीचा अपहार झाल्याचे नमूद करण्यात आले होते.विभागीय आयुक्त कार्यालयात या प्रकरणाची सुनावणी घेण्यात आली. सभागृह बांधकाम, शिलालेख बांधकाम आणि नाली बांधकामासाठी प्रशासकीय व तांत्रिक मान्यता तसेच मोजमाप पुस्तिकेच्या प्रती सादर करण्यात आल्या. मात्र, मोजमाप पुस्तिकेवर उपविभागीय अभियंत्यांची स्वाक्षरी नसणे, काम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र नसणे आणि एक लाख रुपयांवरील कामांसाठी ई-निविदा प्रक्रिया राबविल्याचे दिसून न येणे, या गंभीर त्रुटी निदर्शनास आल्या.एकूण ५ लाख ८१ हजार २१४ रुपयांच्या विकासकामांमध्ये आर्थिक अनियमितता झाल्याचे निरीक्षण नोंदवत विभागीय आयुक्तांनी सरपंच सोजरबाई गायकवाड यांना सरपंचपदावरून अपात्र घोषित केले. तत्कालीन ग्रामपंचायत अधिकाऱ्याविरुद्ध प्रस्तावित शिस्तभंगाची कारवाई पूर्ण करण्याचे तसेच संबंधितांकडून अपहारीत व अनियमिततेची रक्कम व्याजासह वसूल करून शासनखाती जमा करण्याचे (पान २ वर)

कृषी उत्पन्न बाजार समितीतील ३१ भूखंडांच्या लिलाव प्रक्रियेत पारदर्शकता आणा!

संचालक संदीप शिनगारे यांचे आमरण उपोषण सुरू; सर्वसामान्य व्यापाऱ्यांना न्याय देण्याची मागणी

धारूर/अतूल शिनगारे

किल्ले धारूर कृषी उत्पन्न बाजार समितीअंतर्गत असलेल्या ३१ भूखंडांच्या भाडेपट्ट्याने वाटपाची लिलाव प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने राबविण्यात यावी, या मागणीसाठी बाजार समितीचे संचालक संदीप शिनगारे सह युवराज फुन्ने यांनी १७ नोव्हेंबरपासून बाजार समिती कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले आहे. या



भूखंडांच्या वाटप प्रक्रियेत गैरप्रकार होण्याची शक्यता व्यक्त करत त्यांनी प्रशासनाचे लक्ष वेधले आहे.

किल्ले धारूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या प्रांगणातील ३१ भूखंड कृषिपूरक व्यवसायांसाठी व्यापाऱ्यांना भाडेपट्ट्याने देण्यास पणन संचालक, पुणे यांनी २१ सप्टेंबर २०२६ रोजी मंजुरी दिली होती. त्यानंतर ५ नोव्हेंबर २०२६ (पान २ वर)



पशुवैद्यकीय अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या इंटर्नशिप भत्त्यात वाढ करण्याचा निर्णय घेतल्याबद्दल महाराष्ट्रातील विविध पशुवैद्यकीय महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थी व विद्यार्थीनींच्या शिष्टमंडळाने आज माझी रामटेक निवासस्थानी भेट घेऊन आभार मानले. इंटर्नशिप भत्त्यात वाढ करण्याचा निर्णय विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणारा आणि ग्रामीण पशुवैद्यकीय आरोग्यसेवेला बळकटी देणारा आहे.

19 Nov 2026 page 2_Layout 1 11/18/2026 11:07 PM Page 1

धाराशिव शहरातील कचरा डेपो शहराबाहेर हलविण्यासह स्वच्छतेवर काँग्रेसची स्वाक्षरी मोहीम!

धाराशिव/प्रतिनिधी

शहर स्वच्छ, सुंदर आणि प्रदूषणमुक्त करण्यासह शहरातील कचरा डेपो शहराबाहेर हलविणे, नियमित स्वच्छता, तुंबलेल्या गटारी व नाल्यांची स्वच्छता तसेच इतर नागरी समस्यांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी धाराशिव शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने १७ नोव्हेंबरपासून तीन दिवसीय स्वाक्षरी मोहीम राबविण्यात येत आहे.

या मोहिमेअंतर्गत आज छत्रपती शिवाजी महाराज चौक आणि गणेश नगर परिसरात स्वाक्षरी मोहीम राबविण्यात आली. यावेळी नागरिकांनी स्वाक्षरी करण्यासोबतच शहरातील विविध समस्याही पोस्टरवर लिहून मांडल्या. यामधून नागरिकांचा प्रशासनाविषयीचा असंतोष स्पष्टपणे व्यक्त झाला.

शहरातील नागरिकांनी आम्ही नियमितपणे कर भरतो, त्यामुळे आम्हाला स्वच्छता, पाणीपुरवठा आणि आरोग्य यांसारख्या मूलभूत सुविधा मिळणे ही नगरपरिषद प्रशासनाची तसेच निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधींची जबाबदारी आणि कर्तव्य आहे, अशी भावना व्यक्त केली. केवळ कर वसूल न करता नागरिकांना आवश्यक नागरी सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणीही यावेळी करण्यात आली.

या स्वाक्षरी मोहिमेला ज्येष्ठ नागरिक, महिला, युवक तसेच विविध क्षेत्रांतील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. नागरिकांनी स्वतःहून पुढाकार घेत आपल्या परिसरातील समस्या मांडत मोहिमेत सहभाग नोंदविला.



धाराशिव जिल्हा काँग्रेस कमिटी व धाराशिव शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या या मोहिमेत जिल्हाध्यक्ष उमेश राजे निंबाळकर यांच्यासह प्रशांत पाटील, धनंजय राऊत, खलील सय्यद, अग्निवेश शिंदे, अभिमान पेठे, अंकुश पेठे, अजहर पठाण, गोरोबा झेंडे, प्रभाकर लोंढे,अशोक बनसोडे, जयसिंग पवार, ॲड. गणपत कांबळे, हरिदास शिंदे, ॲड. राजूदास आडे, अविनाश रणखांब, पोपट शिंदे, आरिफ मुलानी, बाबा मोमीन, मोइब शेख, दयानंद नागापुरे, सय्यद मन्सूर, महावीर चव्हाण आदी पदाधिकारी, कार्यकर्ते व सहकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शहरातील स्वच्छता आणि मूलभूत नागरी सुविधांच्या प्रश्नांवर नागरिकांचा आवाज प्रशासनापर्यंत पोहोचविण्यासाठी ही स्वाक्षरी मोहीम पुढील दोन दिवसही शहरातील विविध भागांत राबविण्यात येणार आहे.

यशवंत उर्फ बुबासाहेब जाधव यांचे निधन

धाराशिव/प्रतिनिधी



तालुक्यातील चिलवडी येथील यशवंत उर्फ बुबासाहेब माधवराव जाधव (वय ७८ वर्षे) यांचे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. ते हैदराबाद मुक्ती संग्राम लढ्याचे गाढे अभ्यासक होते.तसेच त्यांनी स्वातंत्र्य सैनिकांचे प्रश्न,त्यांच्या पाल्यांना नोकरी, अनुदान यासाठी गेल्या ४० वर्षांपासून अव्याहतपणे कार्य केले. कृषी क्षेत्रामध्ये १९७६ ला (सिडलेस सोनाका द्राक्षाची) नवीन जात विकसित केल्यामुळे त्यांच्या शोधाची दखल आर.सी.एफ. ने घेत त्यांना सुवर्ण पदकाने गौरविण्यात आले. याबरोबरच ग्रामीण भागातील महिला आरोग्य विषयक जनजागृती कार्याची दखल घेत नर्गिस दत्त मेमोरियल हॉस्पिटलने कृतज्ञता पुरस्कार देऊन सन्मानित केले. तर बालपणातील हैदराबाद मुक्तिसंग्रामासाठी अन्यायाविरुद्ध प्रखर लढा दिला. त्यांच्या पार्थिवावर चिलवडी शिवारातील त्यांच्या शेतामध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी जिल्ह्यासह इतर जिल्ह्यातील अनेक मान्यवर नातेवाईक, गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

१४६४ कर्मचाऱ्यांचे सर्वसमावेशक प्राथमिक आरोग्य सेवा (सीपीएचसी) प्रशिक्षण पूर्ण

धाराशिव/जिमाका

ग्रामीण भागातील नागरिकांना त्यांच्या घराजवळच गुणवत्तापुर्ण व सर्वसमावेशक आरोग्य सेवा उपलब्ध करुन देण्याच्या उददेशाने सार्वजनिक आरोग्य मंत्री मा प्रकाशजी आबिटकर यांच्या संकल्पना व राज्य शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार धाराशिव जिल्हयातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये सर्वसमावेशक प्राथमिक आरोग्य सेवा या विषयावर दोन दिवसीय प्रशिक्षण शिबिराचे उदघाटन जिल्हा परिषद अध्यक्षा सौ अर्चना पाटील व उपाध्यक्षा सौ उषाताई रविंद्र गायकवाड यांचे हस्ते करण्यात आले.

तसेच जिल्हा परिषद धाराशिव च्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. प्रियवंदा महाडदळकर यांचे सुचनेनुसार व डॉ. सतीश हरिदास जिल्हा आरोग्य अधिकारी व डॉ धनजंय चाकुरकर जिल्हा शल्यचिकित्सक यांचे मार्गदशनाखाली सर्वसमावेशक प्राथमिक आरोग्य सेवा या विषयावर दोन दिवसीय प्रशिक्षण शिबिरांचे आयोजन करण्यात येत आहे. हे शिबीर यशस्वी व गुणवत्तापुर्ण पार पाडणेकरिता सीपीएचसी नोडल अधिकारी डॉ. विनयशील कुलकर्णी यांच्या नियत्रंणाखाली आजतागायत धाराशिव जिल्हयातील आठ तालुक्यांपैकी धारशिव, कळंब, भुम, परंडा, वाशी व लोहारा या तालुक्यातील ३२ प्राथमिक आरोग्य केंद्र येथील एकूण १ हजार ४६४ अधिकारी, कर्मचारी व आशा स्वयंसेविका यांना यशस्वी व प्रभावीपणे प्रशिक्षण देण्यात आले आहे, अशी माहिती जिल्हा प्रशिक्षण संघ धाराशिव येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. अमोल शिनगारे यांनी दिली. या विशेष प्रशिक्षणामध्ये जिल्हयातील विविध संवर्गातील आरोग्य कर्मचाऱ्यांनी सहभाग नोंदवून आपले प्रशिक्षण पूर्ण केले. यामध्ये प्रा आ केंद्रातील ५७ वैद्यकीय अधिकारी, ९४ समुदाय आरोग्य अधिकारी, ४९ आरोग्य सहाय्यक, ३० आरोग्य सहाय्यीका, ३२ स्टाफ नर्स, १३८ आरोग्य सेविका, १५९ आरोग्य सेवक, ४२ गट प्रवर्तक, ८५६ आशा स्वयंसेविका आणि ७ इतर कर्मचारी यांचा समावेश आहे. या दोन दिवसीय प्रशिक्षण शिबिरादरम्यान



आरोग्य कर्मचा-यांना मार्गदर्शन करण्यासाठी व प्रात्यक्षिक दाखविण्यासाठी जिल्हयातील स्त्रीरोग तज्ञ डॉ.आय के मुल्ला, डॉ संजय नलावडे, डॉ सुजित नायकल, डॉ. वैशाली चाकोते तसेच बालरोग तज्ञ डॉ. श्रीधर जाधव, डॉ. अक्षय देशमुख व आपतकालीन वैद्यकीय सेवा या करिता भिषक डॉ. प्रशांत रेवडकर, डॉ. दिपक निंभोरकर , सामान्य व किरकोळ आजारांबाबत माहिती देणेकरिता डॉ. अमोल शिनगारे, डॉ. पी. डी. धनके , असंसर्गजन्य आजारांबाबत माहिती देणेकरिता डॉ. विक्रांत राठोर, डॉ. अमोल पांढरे, मानसिक आजारांची छाननी व व्यवस्थापन या विषयांकरिता मनोविकार चिकित्सक सुहास शिंदे व समाजसेवक बलराम पोतदार, राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रम व संसर्गजन्य आजारांच्या व्यवस्थपनाकरिता संजय शिंदे व निळकंठ मोरे, कुटुंब कल्याण विषयांकरिता व्ही पी बुटे व सुनिता जाधव आणि वृध्दपकाळातील वेदनाशामक सेवा या विषयांकरिता मंजुश्री सुरवसे व सुवर्णा सुरवसे यांनी विविध सत्रांमध्ये मोलाचे मार्गदर्शन केले. तसेच या दोन दिवसीय सर्वसमावेशक प्राथमिक आरोग्य सेवा प्रशिक्षण तथा शिबिरांमुळे जिल्हयातील आरोग्य वर्धिनी प्रा आ केंद्र व उपकेंद्र यांना राष्ट्रीय गुणवत्ता हमी मानके याबाबत मानांकने मिळवणेकरिता भरपुर प्रमाणात उपयोग झाला. तसेच या प्रशिक्षणामुळे आरोग्य कर्मचाऱ्यांचे ज्ञान व कौशल्य वृद्धिंगत होऊन ग्रामीण भागातील नागरिकांना गुणवत्तापूर्व आरोग्य सेवा मिळण्यास मदत होणार आहे.

पान १ वरून....

फुलचंदराव कराड

तालुक्यातील असंख्य शेतकरी उपस्थित होते. सततची दुष्काळी परिस्थिती, पावसाचा लहरीपणा, वाढता उत्पादन खर्च,शेतीसाठी लागणारे पाणी, खते, औषधे व मजुरीचे वाढते दर यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक गणित पूर्णपणे कोलमडले आहे.ऊस पिकविण्यासाठी शेतकरी वर्षभर प्रचंड मेहनत आणि आर्थिक गुंतवणूक करतो.मात्र,उसाची तोडणी,वाहतूक,ऊसदर,बिलाची रक्कम वेळेत मिळणे,सभासदांना मिळणाऱ्या सवलती तसेच कामगारांचे प्रश्न या बाबतीत ओंकार शुगर युनिट नं.८ च्या प्रशासनाकडून सातत्याने दुर्लक्ष होत असल्याने शेतकर्यांचे हे प्रश्न हाती घेत शिवसेना शिंदे गटाचे महाराष्ट्र राज्य समन्वयक फुलचंदराव कराड यांनी दि.१८ नोव्हेंबर रोजी पांगरी येथील ओंकार शुगर युनिट नं.८ कारखान्याच्या प्रशासकीय कार्यालयावर धडक मारली.यावेळी त्यांनी चालू गळीत हंगामासाठी उसाचा दर जाहीर करून शेतकऱ्यांना एकरकमी ऊसदर द्यावा,ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या नोंदीनुसार ऊसतोडणीचे नियोजन करून कोणत्याही शेतकऱ्यावर अन्याय होणार नाही,याची दक्षता घ्यावी.ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे ऊस बिल ठरलेल्या कालमर्यादेत त्यांच्या बँक खात्यात जमा करावे.वैद्यनाथ सहकारी साखर कारखान्याच्या सभासदांना पूर्वीप्रमाणे मिळणाऱ्या सर्व सवलती व सुविधा पुन्हा सुरू कराव्यात.वैद्यनाथ सहकारी साखर कारखान्याच्या सभासद व भागधारकांच्या उसाच्या तोडणीला प्राधान्य देण्यात यावे.वैद्यनाथ कारखान्याच्या सभासद व भागधारकांसाठी ओंकार कारखाना व्यवस्थापनाने कोणते प्राधान्यक्रम व सुविधा निश्चित केल्या आहेत, याबाबत स्पष्ट भूमिका जाहीर करावी,सन १९९९ च्या कर्मचाऱ्यांना कायम नियुक्ती द्यावी,सन २०२५-२६ च्या गळीत हंगामातील जाहीर केलेला प्रतिटन १०० रुपयांचा हप्ता आमच्या निवेदनानुसार देण्यात आला आहे मात्र भविष्यातील ऊस बिल व अतिरिक्त हप्त्यांच्या देयकांबाबत निश्चित वेळापत्रक जाहीर करावे,मराठवाड्यातील कारखान्यांनी नॅचरल शुगर प्रमाणे भाव द्यावा अशा मागण्यांचे जनरल मॅनेजर यांना निवेदन देवुन चर्चा केली.यावेळी ऊस उत्पादक शेतकरी शरद नागोराव गिते,उपसरपंच अरुण मुंडे,इंद्रमोहन मुंडे,वैजनाथ कराड,रवि कराड,जयराम श्रीराम मुंढे,विश्वनाथ बंकटराव मुंडे,सुधाकर बनसोडे,लक्ष्मण दिवटे,रामप्रभू विश्वनाथ कराड,संभाजी सोळंके,यशवंत सोनवणे,शरद गित्ते,प्रकाश राठोड, बाबुराव मुंडे,भारत कराड,मंचकराव मुंडे, सिध्दार्थ बनसोडे,बालु कराड,संभाजी कराड,सोपान कराड,रमेश राठोड आदी असंख्य शेतकरी उपस्थित होते.

वेळ पडली तर शेतकऱ्यांसाठी रस्त्यावर उतरु-फुलचंदराव कराड

ओंकार शुगर प्रशासनाने परळी तालुका व परिसरातील शेतकऱ्यांच्या या मागण्या सोडविण्यासाठी मी माझ्या तब्येतीची चिंता न करता लढण्यासाठी मैदानात उतरलो असुन या मागण्या त्वरीत सोडविल्या नाहीत तर हजारो शेतकर्यांना सोबत घेवुन आंदोलन करत शेतकर्यांचे प्रश्न सुटेपर्यंत लढत रहाणार असल्याचे फुलचंदराव कराड यांनी सांगितले.

.....

पोलिसांकडून अटक

निरीक्षक श्री. मल्हारी शिवरकर यांनी सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. सचिन पागोटे यांच्याकडे सोपविला होता. गुन्हा दाखल झाल्यापासून आरोपी फरार होता. अखेर दिनांक १८ नोव्हेंबर २०२६ रोजी पोलिसांनी शिवाजीनगर, परळी वैजनाथ येथून आरोपीस अटक केली. मा. पोलीस अधीक्षक श्री. नवनित कावत, अपर पोलीस अधीक्षक श्री. समीर शेख, सहाय्यक पोलीस अधीक्षक श्री. ऋषिकेश शिंदे तसेच पोलीस निरीक्षक श्री. मल्हारी शिवरकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. सचिन पागोटे, पोलीस अंमलदार पोअ/२०८ पोकळे व पोलीस अंमलदार १८७९ केदार यांनी ही कारवाई केली. अटक करण्यात आलेल्या आरोपीस मा. न्यायालयाने न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.

.....

हालचालींना वेग

धारूर तालुक्यात यंदा दुष्काळी परिस्थिती निर्माण झाल्याने ग्रामीण भागात पाणीटंचाईचे संकट अधिक गडद होत आहे. अनेक गावांमध्ये पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला असून, टंचाईवर तातडीने उपाययोजना करण्याची मागणी होत होती. या पार्श्वभूमीवर पंचायत समितीने विहीर आणि बोअर अधिग्रहणाचे प्रस्ताव तयार करून मंजुरीसाठी तहसील कार्यालयाकडे पाठविले होते. मात्र, पंधरा दिवस उलटूनही या प्रस्तावांना मंजुरी मिळत नसल्याने टंचाई निवारणाच्या कामात अडथळा निर्माण झाला होता.दरम्यान, ३ नोव्हेंबर रोजी झालेल्या आढावा बैठकीत आमदार प्रकाश सोळंके यांनी दुष्काळी परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन अधिग्रहणाच्या प्रस्तावांना तातडीने मंजुरी देण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या होत्या. तरीही प्रशासकीय दिरंगाईमुळे प्रस्ताव रखडले होते. अखेर तहसिल प्रशासनाने मंडळ अधिकाऱ्यांकडून प्रस्तावांची पडताळणी आणि अहवाल मागविण्याची प्रक्रिया वेगाने पूर्ण केली. मंगळवारी उशिरापर्यंत अहवालांची तपासणी करण्यात आली. अखेर बुधवारी दुपारी तहसीलदार श्रीकांत निळे यांनी २९ विहीर-बोअर अधिग्रहण प्रस्तावांना मंजुरी देत आदेश पंचायत समितीकडे पाठविले.

.....

अपात्र शोषित

आदेश मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना दिले आहेत.या निर्णयामुळे धारूर तालुक्यातील ग्रामपंचायत वर्तुळात खळबळ उडाली असून, ग्रामपंचायतींच्या विकासकामांतील आर्थिक व्यवहारांवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

धारूर तालुक्यातील अनेक ग्रामपंचायतीचा असाच कारभार

धारूर तालुक्यामध्ये अनेक ग्रामपंचायतीने एक लाखापेक्षा अधिक रकमेची कामे करताना ई टेंडरिंग पद्धत राबविण्यात आलेली नाही .यामुळे साध्या पद्धतीने बी -१ टेंडर करून खतरमातुर कामे करून पैसे उचलण्यात येतात .वाघोली प्रकरणामुळे आता इतरही ग्रामपंचायतीमध्ये असे प्रकार समोर येऊ शकतात

.....

कृषी उत्पन्न बाजार समिती

रोजी झालेल्या बाजार समितीच्या संचालक मंडळाच्या बैठकीत मार्केट यार्डमधील भूखंडांच्या संदर्भात विचारविनिमय करून पुढील निर्णय घेण्याबाबत प्रस्ताव ठेवण्यात आला होता.या भूखंडांसाठी निश्चित करण्यात आलेल्या किमतीनुसार २८ भूखंडांची प्रत्येकी १ लाख ५७ हजार १८६ रुपये, दोन भूखंडांची प्रत्येकी १ लाख ४ हजार ५२० रुपये, तर एका भूखंडाची ८७ हजार १०० रुपये किंमत निश्चित करण्यात आली आहे. या निश्चित दरानुसार नियमानुसार खुली व पारदर्शक लिलाव प्रक्रिया राबवून भूखंड भाडेपट्ट्याने देणे आवश्यक असल्याची भूमिका संदीप शिनगारे यांनी मांडली आहे.मात्र, बाजार समितीतील काही प्रमुख पदाधिकाऱ्यांकडून लिलाव प्रक्रियेत अनियमितता होण्याची शक्यता असून, त्यामुळे प्रत्यक्षात कृषिपूरक व्यवसाय करण्यास इच्छुक असलेले गरजू व सर्वसामान्य व्यापारी भूखंड मिळण्यापासून वंचित राहू शकतात, अशी भीती त्यांनी व्यक्त केली आहे. भूखंडांचे वाटप कोणत्याही दबावाला किंवा हितसंबंधांना बळी न पडता नियमानुसार खुल्या लिलावाद्वारे करण्यात यावे, सर्व इच्छुक व्यापाऱ्यांना समान संधी मिळावी आणि संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक ठेवावी, या मागण्यांसाठी त्यांनी आमरण उपोषणाचे हत्यार उपसले आहे. या उपोषणामुळे कृषी उत्पन्न बाजार समितीतील भूखंड वाटपाचा प्रश्न ऐरणीवर आला असून, बाजार समिती प्रशासन यावर काय भूमिका घेते, याकडे व्यापारी वर्गाचे लक्ष लागले आहे. या उपोषण स्थळी प्रदेश कार्यकारणी सदस्य तथा माजी नगराध्यक्ष डॉ स्वरूपसिंह हजारी, विठ्ठल दादा शिनगारे, विीायक शिनगारे, बालू पिलाजी सह शहरातील विविध राजकीय सामाजिक क्षेत्रातील पदाधिकारी कार्यकर्त्यांनी भेट देऊन उपोषणाला पाठिंबा दिला.

शेवटच्या पानावरून...

पालम

आणि दलालांच्या फायद्यासाठी?'' असा सडेतोड आणि संतप्त सवाल हतबल शेतकरी वर्ग उपस्थित करत आहे.

हातातोंडाशी आलेला रब्बीचा हंगाम जाण्याची भीती:

तालुक्यातील शेतकऱ्यांनी महागडी मशागत करून, कर्जबाजारी होऊन आपल्या शेतात पेरणीची संपूर्ण तयारी करून ठेवली आहे. मात्र, कृषी विभाग आणि दुकानदारांच्या या कृत्रिम टंचाई निर्माण करणाऱ्या व मनमानी कारभारामुळे वेळेवर बियाणे मिळत नाही. जर असाच कारभार सुरू राहिला, तर आमचा रब्बीचा हंगाम पूर्णपणे हातातून निघून जाईल*आणि आमचे अतोनात आर्थिक नुकसान होईल, अशी भीती त्रस्त शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.या शेतकऱ्यांचे प्रशासनाला थेट आव्हान:

या मुजोर कारभाराविरोधात पालम तालुक्यातील शेतकरी आक्रमक झाले असून, यात प्रामुख्याने .ज्ञानोबा दगडोबा रोकडे .जाफर खा रोशन का पठाण. .आश्रोबा बाबुराव पैकी.श्रीधर ज्ञानोबा रोकडेयांच्यासह संतप्त शेतकरी वर्गाने या प्रकाराची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी केली आहे.

तातडीने कारवाईची मागणी

वरिष्ठ जिल्हास्तरीय कृषी अधिकाऱ्यांनी या गंभीर आणि तातडीच्या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष द्यावे. बियाण्यांसोबत औषधे विकण्याची सक्ती करणाऱ्या त्या दोन्ही दुकानदारांवर तातडीने कठोर कारवाई करावी आणि पालम तालुक्यातील सर्वसामान्य शेतकऱ्यांना लवकरात लवकर काबुली चना बियाणे उपलब्ध करून द्यावे, शेतकऱ्यांची मागणी होत आहे

.....

पिळवणूक

अधिकारी महेश रायबान व खेमनार यांना सक्तीच्या रजेवर पाठवले नाही, तर उपप्रादेशिक परिवहन कार्यालयासमोर अनोखे आंदोलन केले जाईल. असा इशारा देण्यात आला आहे. निवेदनावर जिल्हाप्रमुख राज धज, महिला आघाडी जिल्हाध्यक्ष बालीकाताई सूर्यवंशी, युवक जिल्हाध्यक्ष अनिल वाघमारे, शहर अध्यक्ष कुमार गायकवाड आणि अल्पसंख्याक जिल्हाध्यक्ष हाफिज ढालुज यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

.....

वसंतराव मुंडे

भाव आणि शेतकऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्या या विषयांना प्राधान्य देऊन काम करण्याचा आपला प्रयत्न राहणार असल्याचे वसंतराव मुंडे यांनी स्पष्ट केले. शेतकऱ्यांच्या समस्या केवळ निवेदनांपुरत्या मर्यादित न ठेवता त्या शासन आणि प्रशासनाच्या निदर्शनास आणून देणे, शेतकऱ्यांना त्यांच्या हक्कांची जाणीव करून देणे आणि त्यांच्या न्याय्य मागण्यांसाठी संघटनात्मक पातळीवर पाठपुरावा करणे, यासाठी किसान काँग्रेसच्या माध्यमातून प्रभावीपणे काम करण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला.

.....

ग्लोबल विकास ट्रस्ट

आणि अधिक उत्पन्न देणाऱ्या शेतीकडे वळविण्यासाठी संस्थेने सातत्याने सहकार्य केले. तसेच यापुढेही संस्थेचा संपर्क असलेल्या गावांमध्ये ''जलतारा'' सारखे प्रभावी जलसंधारणाचे काम केले जाणार आहे. केळी लागवडीसाठी भांडवलाची अडचण ओळखून ए. यू. स्मॉल फायनान्स बँकेच्या माध्यमातून ३६ शेतकऱ्यांना प्रत्येकी १ लाख २० हजार रुपयांचे आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्यात आले. उच्च दर्जाची केळी रोपे अल्प दरात देण्यासोबतच बांधावर जाऊन निःशुल्क मार्गदर्शन करण्यात आले. दुष्काळात उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करता यावा, यासाठी मोफत ठिबक सिंचन संचही वितरित करण्यात आले. आर्थिक मदत, तांत्रिक मार्गदर्शन आणि पाणी व्यवस्थापनाच्या या एकत्रित सहकार्यामुळे शेतकऱ्यांचा केळी लागवडीचा प्रयोग यशस्वी झाला. शेतीतील उत्पादनाला योग्य बाजारपेठ आणि भाव मिळणे ही मोठी अडचण असते. ही बाब लक्षात घेऊन ग्लोबल विकास ट्रस्टने शेतकऱ्यांना निर्यातक्षम केळी उत्पादनासाठी आवश्यक मार्गदर्शन व सहकार्य केले. तसेच, शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या केळीला आंतरराष्ट्रीय बाजारपेठ उपलब्ध व्हावी, यासाठी संस्थेच्या वतीने शेतकऱ्यांची थेट ट्रायडंट ऍग्रोकॉम यांच्याशी समन्वय करार करून निर्यातदारांसोबत जोडणी करून देण्यात आली. शेतकऱ्यांना व्यापारी मूल्यसाखळीशी जोडण्याच्या या प्रयत्नांमुळे मांडवा पठाणच्या ३६ शेतकऱ्यांची केळी विदेशात निर्यात होत असून, त्यांना लाखोंचे उत्पन्न मिळू लागले आहे. दुष्काळाच्या झळा सोसत आधुनिक शेतीतून समृद्धीची वाट निर्माण करणाऱ्या मांडवा पठाणच्या शेतकऱ्यांनी हे सिद्ध केले आहे की, योग्य मार्गदर्शन, आर्थिक आधार, तंत्रज्ञान, बाजारपेठ आणि शेतकऱ्यांची जिद्द एकत्र आली तर दुष्काळी परिस्थितीतही शेतीतून परिवर्तन घडू शकते. ग्लोबल विकास ट्रस्टचे सहकार्य आणि शेतकऱ्यांच्या कष्टातून साकारलेली ही यशोगाथा मराठवाड्यातील हजारो शेतकऱ्यांसाठी आशेचा किरण आणि प्रेरणादायी उदाहरण ठरत आहे.

.....

ग्लोबल विकास ट्रस्टचे योगदान!

मांडवा पठाण येथील शेतकऱ्यांच्या यशामागे ग्लोबल विकास ट्रस्टचे मोठे योगदान आहे. फळबाग लागवडीसाठी शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करणे, इच्छुक शेतकऱ्यांना अनुदानित उच्च दर्जाची रोपे देणे, शेतकऱ्यांना निःशुल्क निवासी आणि अनिवासी तांत्रिक मार्गदर्शन करणे, सिंचनाच्या सोयीसाठी ठिबक सिंचन संच मोफत उपलब्ध करून देणे, भांडवली अडचण असलेल्या शेतकऱ्यांना ए. यू. स्मॉल फायनान्स बँकेच्या माध्यमातून आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देणे, निर्यातक्षम केळी उत्पादनासाठी आवश्यक तांत्रिक सहकार्य करणे, तसेच शेतकऱ्यांनी पिकवलेल्या केळीला योग्य बाजारपेठ व भाव मिळवून देण्यासाठी थेट निर्यातदारांसोबत जोडणी करून देण्यापर्यंतचे योगदान संस्थेच्या मार्फत देण्यात येते. याचबरोबर नदी पुनरुज्जीवन आणि जलसंधारणाची कामे मोठ्या प्रमाणावर झाल्याने शेतीसाठी पाणी मोठ्या प्रमाणावर उपलब्ध झाल्याने शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

.....

२० नोव्हेंबर

मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. शेतकऱ्यांच्या घामाला योग्य दाम मिळाला पाहिजे, शेतीमालाला रास्त भाव मिळाला पाहिजे, शेतकऱ्यांच्या कष्टाचा सन्मान झाला पाहिजे आणि त्यांच्या न्याय्य मागण्यांची शासनाने तातडीने दखल घेतली पाहिजे, यासाठी आता एकजुटीने रस्त्यावर उतरण्याची वेळ आली आहे.

आता नाही तर कधीच नाही!

आपल्या हक्कासाठी आपणच लढले पाहिजे. आपली एकजूट हीच आपली खरी ताकद आहे. त्यामुळे पक्ष, संघटना, राजकीय मतभेद आणि हेवेदावे बाजूला ठेवून सर्व शेतकरी बांधवांनी बळीराजाच्या न्यायासाठी एकत्र यावे. ऊस उत्पादक असो, कापूस उत्पादक असो, सोयाबीन उत्पादक असो किंवा पशुधन जगवणारा शेतकरी असो, प्रत्येक शेतकऱ्याचा प्रश्न हा आपला प्रश्न आहे. आपल्या घामाला दाम मिळवून देण्यासाठी या आंदोलनातील प्रत्येक शेतकऱ्याची उपस्थिती ही अत्यंत महत्त्वाची आहे. त्यामुळे शुक्रवार, दिनांक २० नोव्हेंबर रोजी सकाळी ठीक ११ वाजता पाडळसिंगी टोलनाक्यावर हजारोंच्या संख्येने उपस्थित राहून या आंदोलनाला ऐतिहासिक ताकद द्यावी, असे आवाहन श्री गायके राजू यांनी केले आहे. यावेळी श्री दिनकर रिंगणे, श्री श्रीनिवास भोसले, शेख खिजर जैनुद्दीन, श्री बाळासाहेब शेंडगे, श्री बाळासाहेब डहाळे सर, श्री जयदेव शिंगणे, श्री नारायण करपे, धर्मराज गायके, अंगद घोलप, कहानू महाराज गायके, चिंतामण महाराज मोरे, चंद्रशेखर जाधव, कल्पेश गायके, हनुमान घोलप, सिद्धेश्वर पवार, सावळाराम गायके, कचरू गिराम, राम गायके आदी पदाधिकारी व शेतकरी उपस्थित होते.

.....

शिवाचार्य महाराज

मार्गदर्शनाखाली आणि श्री गुरु सिद्धचैतन्य शिवाचार्य महाराज साखरखेर्डेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत सहा दिवसीय पदयात्रेला प्रारंभ झाला. या सोहळ्यात शेकडो भाविकांनी सहभागी होत भक्तीचा जागर केला.

दिंडीचा प्रारंभ संत श्री गुरुलिंग स्वामी मठ संस्थान, बेलवाडी येथून झाला. यावेळी श्री गुरु सिद्धचैतन्य शिवाचार्य महाराज यांनी उपस्थित भाविकांना आशीर्वचन दिले. संत श्री मन्मथ स्वामी महाराज यांच्या जीवनचरित्रातील विविध प्रसंग आणि त्यांच्या आध्यात्मिक विचारांचा संदर्भ देत महाराजांनी भाविकांना मार्गदर्शन केले. यावेळी आशीर्वचनातून श्री गुरु सिद्धचैतन्य शिवाचार्य महाराज यांनी संत श्री मन्मथ स्वामी महाराज यांच्या जीवनकार्याचे महत्त्व विशद केले. संतांचे जीवन हे त्याग, तपश्चर्या, भक्ती आणि समाजप्रबोधनाचा आदर्श असते. संत मन्मथ स्वामींनी दिलेले विचार आणि शिकवण आजही समाजासाठी प्रेरणादायी आहेत. त्यांच्या जीवनातील प्रसंगातून माणसाने श्रद्धा, निष्ठा, सदाचार आणि मानवतेची शिकवण घ्यावी. केवळ संतांचे नामस्मरण करून चालणार नाही, तर त्यांनी सांगितलेल्या विचारांचे आचरण आपल्या जीवनात झाले पाहिजे. भक्तीच्या माध्यमातून मनाची शुद्धता आणि समाजात एकोपा निर्माण झाला पाहिजे. संतांच्या विचारांचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे, असा आध्यात्मिक संदेश महाराजांनी आपल्या आशीर्वचनातून दिला.

.....

अतिक्रमणे हटवा

संभाजी महाराज चौक ते प्रभू वैद्यनाथ मंदिर या मार्गावर वाहनांची मोठ्या प्रमाणात गर्दी होत असून, रस्त्यावरील वाहनांचे अतिक्रमण तसेच फुटपाथवर करण्यात आलेली अतिक्रमणे भाविकांच्या वाहतुकीस अडथळा ठरत आहेत. त्यामुळे संबंधित मार्गावरील अतिक्रमणे तातडीने हटवून वाहतूक व्यवस्था सुरळीत करावी, जेणेकरून पायी दिंड्यांमधील भाविकांना सुरक्षितपणे मार्गक्रमण करता येईल. तसेच कार्तिक पौर्णिमेनिमित्त मोठ्या संख्येने वीरशैव लिंगायत समाजाचे भाविक श्री क्षेत्र कपिलधार (मन्मथ स्वामी) येथे दर्शनासाठी जात असतात. या भाविकांच्या सोयीसाठी बेलवाडी येथे स्नानगृहाची व्यवस्था करावी तसेच पिण्याच्या व वापराच्या पाण्यासाठी पाण्याचे टँकर उपलब्ध करून द्यावेत, अशीही मागणी करण्यात आली आहे. कार्तिक पौर्णिमेच्या धार्मिक पर्वावर परळी मार्गे जाणाऱ्या हजारो भाविकांना कोणताही त्रास होऊ नये, यासाठी नगरपरिषद प्रशासनाने या मागण्यांची गांभीर्याने दखल घेऊन तातडीने आवश्यक उपाययोजना कराव्यात, असे आवाहन नगरसेवक नितीन बागवाले यांनी केले आहे.

.....

रामप्रसाद देवकर

गणपत पिटेवाड , महाराष्ट्र समन्वयक ब्रम्हा साहेब ,महाराष्ट्र सचिव रमेश धोत्रे, हिंगोली जिल्ह्या तील माजी नगरसेवक बाबुरावजी जाधव , लक्ष्मण पापणकर ,तुळशिराम जाधव ,करण देवकर,सुनिल देवकर समाज सेवक शिवाजी शेळके,शुभम मस्के, सर्व हिंगोली जिल्ह्यातील प्रतीष्ठित मडंळी उपस्थित होती तसेच महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांतील पदाधिकारी उपस्थित होते

.....

गणेश आघाव

अल्पवयातच व्यवसायात स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली होती. मित्रपरिवारात त्यांचा मोठा वावर आणि स्नेह होता. आज (दि. १८ नोव्हेंबर) सायंकाळी ४ वाजता शोकाकुल वातावरणात टोकावडी येथे त्यांच्या पार्थिवावर अंत्यविधी करण्यात आले. राख सावडण्याचा विधी (दि. २० नोव्हेंबर) रोजी सकाळी ७ वाजता टोकवाडी येथे पार पडेल. त्यांच्या पश्चात पत्नी, आई, एक भाऊ आणि आजी असा परिवार आहे. ईश्वर दिवंगत गणेश यांच्या आत्म्यास चिरशांतो लाभो आणि शोकाकुल कुटुंबास हे दुःख सहन करण्याची शक्ती

महाराष्ट्रातील निर्भिड साप्ताहिक रविवार

जगमित्र

विष्णू निवृत्ती कदम
(संपादक जालना, आवृत्ती), ९४२२९९१०३२, ७३८५८९०४४४

PRGI.No.- MHMAR/25/A2848

जालना — गुरुवार दि.१९ नोव्हेंबर २०२६ — पाने ४ — पान नं.३

स्वाती जिगे/भालेराव यांना 'पीएच.डी.' पदवी प्रदान

अंबड । ज्ञानेश्वर साळुंके

छत्रपती संभाजीनगर येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने इंग्रजी विषयातील संशोधनासाठी अंबड तालुक्यातील मठपिंपळगाव (ह.मु.नाशिक) येथील स्वाती बळीराम जिगे/ स्वाती मिलींद भालेराव यांना 'डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी' (झह.ऊ) पदवी प्रदान केली आहे. त्यांनी मानव्यविद्या शाखा अंतर्गत इंग्रजी विषयात ही पदवी संपादन केली आहे.

स्वाती जिगे/भालेराव यांनी भारतीय खेळांमधील संस्कृती: निवडक महिला आत्मचरित्रांचा अभ्यास (CULTURE IN INDIAN SPORTS: A



STUDY OF SELECT WOMEN AUTOBIOGRPHIES) या विषयावर आपला शोधनिबंध सादर केला होता.

या संशोधनासाठी त्यांनी वाळूज (ता. गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर) येथील दगडोजीराव देशमुख कॉलेजचे इंग्रजी विषयाचे विभागप्रमुख प्रा.डॉ. रमेश भानुदास जायभाये यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधन कार्य पूर्ण केले. विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाद्वारे १३ नोव्हेंबर २०२६ रोजी यासंदर्भातील अधिकृत अधिसूचना जारी करण्यात आली आहे. स्वाती जिगे/भालेराव यांच्या या यशाबद्दल डॉ.राहुल पाटील डोंगरे, प्रा.डॉ. बाबासाहेब डोळे, प्रा.डॉ. शिवाजी मदन, प्रा.डॉ. सर्जेराव जिगे, प्रा.डॉ. आनंद उबाळे, प्रा.डॉ. ज्ञानेश्वर सूर्यवंशी, प्रा.डॉ. प्रसाद मदन, प्रा.डॉ. राहुल हजारे, डॉ.योगेश गांगुर्डे, प्रा.रविंद्र पाटील जिगे, मधुकर भालेराव, मिलींद भालेराव, शेखर म्हस्के, बळीराम जिगे, संदीप मुरकुटे, कृष्णा क्षीरसागर, योगेश जिगे, मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष संतोष जिगे, प्रा.सुभाष जिगे, दादासाहेब जिगे, प्रा. रमेश गाढे यांनी अभिनंदन केले.

जालन्यात 'वडापाव' हॉटेलच्या आडोशाने सुरु असलेला वेश्याव्यवसाय उघड

अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाची धडक कारवाई, ३ पीडित महिलांची सुटका

जालना । ज्ञानेश्वर साळुंके

जालना शहरातील बसस्टँड रोडवरील गजबजलेल्या भागात एका वडापाव हॉटेलच्या आडोशाने सुरू असलेल्या अनैतिक प्रकाराचा अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाने पर्दाफाश केला आहे. हॉटेल मालकाने स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी बाहेरून महिलांना बोलावून हा गोरखधंदा चालवला होता. या धाडसी कारवाईत पोलिसांनी ६ पुरुष आरोपींना जेरबंद केले असून, ३ पीडित महिलांची सुरक्षित सुटका करण्यात आली आहे.

गुप्त माहिती आणि सापळा

अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाला गुप्त बातमीदाराकडून खात्रीशीर माहिती मिळाली होती की, बसस्टँड रोडवरील 'न्यु मुंबई वडापाव हॉटेल'चा मालक हा हॉटेलच्या आडोशाने वेश्याव्यवसाय चालवत आहे. या माहितीची खात्री पटल्यानंतर पोलीस अधीक्षक श्री. तेघबीर सिंह संधू, अपर पोलीस अधीक्षक श्री. विक्रम साळी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाच्या पथकाने या ठिकाणी अचानक छापा टाकला.

आरोपींचे जाळे आणि मुद्देमाल:छापा टाकण्यात आलेल्या हॉटेलमध्ये अनैतिक प्रकार सुरू असल्याचे उघड झाले. पोलिसांनी घटनास्थळावरून ३ पीडित महिलांची सुटका केली. तसेच मौके से खालील आरोपींना ताब्यात घेण्यात आले आहे. शेख कैसर शेख कमरोद्दीन (वय ३५ वर्ष, रा. शास्त्री मोहल्ला, जुना जालना), आशिष किशन बावरीया (वय ३१ वर्ष, रा. ओम शांती गल्ली, संभाजीनगर, जालना), पुरुषोत्तम नानाभाऊ आडाणी (वय ४४ वर्ष, रा. सुवर्णकार नगर, रामनगर, जालना), प्रेम शिवहारी सानप (वय २३ वर्ष, रा. शंकर नगर, तेली मामा गल्ली, जालना), बजरंग तात्या शिवरकर (वय २७ वर्ष, रा. लहुजी नगर, चंदनझिरा, जालना), हॉटेल मालक शेख शाहिद शेख चाँद हा फरार असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत. या कारवाईदरम्यान पोलिसांनी आरोपींकडून रोख २,४१० रुपये आणि ९३,०००/- रुपये किमतीचे मोबाईल असा एकूण मुद्देमाल जप्त केला आहे.

सदर प्रकरणी पोलीस ठाणे सदर बाजार येथे महिलांच्या अनैतिक व्यापारास प्रतिबंध अधिनियम १९५६ चे कलम ३, ४, ५, ७ प्रमाणे मपोउपनि दिपाली शिंदे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सुरू आहे. ही धडक कारवाई अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाचे प्रभारी अधिकारी पो.नि. सोमनाथ शिंदे, मपोउपनि दिपाली शिंदे, ग्रेड पोउपनि रवी जोशी, ग्रेड पोउपनि संजय गवळी, महिला अंमलदार पुष्पा खरटमल, निमा धनघाव व चालक पोलीस अंमलदार संजय कुलकर्णी यांच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली.



दिव्यांगांनी सहा हजार मानधनासाठी वर्षा निवासस्थानावर ठिय्या द्यावा; सर्व व्यवस्था मुख्यमंत्री फडणवीस करतील : मनोज जरांगे पाटील

जालना । प्रतिनिधी

राज्यातील दिव्यांग बांधवांना दरमहा सहा हजार रुपये मानधन मिळावे, यासाठी महाराष्ट्रातील सर्व दिव्यांगांनी मुंबई येथील वर्षा निवासस्थानावर ठिय्या देऊन बसावे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे सर्व व्यवस्था करतील. दिव्यांगांनी आपल्या मागणीसाठी एकजुटीने पुढे आले पाहिजे. सहा हजार रुपयांचे मानधन मिळविण्याचे हे सोपे गणित आहे, असा सल्ला संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांनी दिला. अपंग जनता दल सामाजिक संघटनेच्या मागणीला संघर्ष युद्धा मनोज जरागे पाटील यांनी पाठिंबा जाहीर केला आहे.

जालना महानगरपालिकेच्या सभापती संध्या देठे यांच्या सासूबाई तथा सामाजिक कार्यकर्ते संजय देठे यांच्या मातोश्रींचे निधन झाल्याने मनोज जरांगे पाटील यांनी देठे कुटुंबीयांची भेट घेऊन सांत्वन केले. यावेळी त्यांनी दिव्यांग बांधवांच्या सहा हजार रुपये



मानधनाच्या मागणीवर भाष्य केले.यावेळी बोलताना मनोज जरांगे पाटील म्हणाले की, राज्यातील सर्व दिव्यांग बांधवांनी मुंबईतील वर्षा निवासस्थानावर जाऊन ठिय्या मांडावा. आपल्या मागण्यांसाठी एकत्रितपणे आवाज उठवावा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे सर्व व्यवस्था करतील. दिव्यांगांना दरमहा सहा हजार रुपये मानधन मिळावे, यासाठी त्यांनी ठामपणे आपली भूमिका मांडावी, असे आवाहन त्यांनी केले. या सांत्वन भेटीप्रसंगी जालना महानगरपालिकेचे उपमहापौर राजेश राऊत, शिवसेनेचे शहरप्रमुख विष्णू भाऊ पाचपुले, मनसेचे जिल्हाप्रमुख रवी राऊत, सामाजिक कार्यकर्ते प्रशांत वाडेकर, माजी नगराध्यक्ष सुनील बापू आर्दड मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष अरविंदराव देशमुख, अपंग जनता दल सामाजिक संघटनेचे जिल्हाध्यक्ष राहुल मुळे, सागर पाटील यांच्यासह मराठा समाजातील बांधव आणि विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी व सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

जिल्हाधिकारी अशिमा मित्तल यांची रेवगाव येथे क्षेत्रभेट; विविध उपक्रमांची पाहणी व ग्रामस्थांशी संवाद

जालना । प्रतिनिधी

जालना तालूक्यातील रेवगाव येथे जिल्हाधिकारी अशिमा मित्तल यांनी आज क्षेत्रभेट देऊन गावातील विविध विकासात्मक व सामाजिक उपक्रमांची पाहणी केली. या दौऱ्यादरम्यान त्यांनी प्रारंभिक बालविकास (एउऊ) उपक्रमांतर्गत सहभागी मातांच्या घरी भेट देऊन त्यांच्याशी संवाद साधला तसेच अंगणवाडी केंद्राला भेट देऊन माता, अंगणवाडी सेविका व क्षेत्रीय कर्मचाऱ्यांकडून उपक्रमाच्या अंमलबजावणीचा आढावा घेतला.



यावेळी मातांचे मानसिक आरोग्य, स्तनपान, बालसंगोपन आणि कुटुंबातील सदस्यांचा सहभाग या विषयांवर चर्चा करण्यात आली. उपक्रमामुळे मातांना मिळणारा भावनिक आधार, गृहभेटींच्या माध्यमातून होणारे मार्गदर्शन आणि कुटुंबपातळीवर होत असलेले सकारात्मक बदल याबाबत माहिती घेण्यात आली. तसेच जिल्हाधिकाऱ्यांनी स्वामी समर्थ केंद्र, आरोग्य उपकेंद्र आणि प्रगतिशील शेतकरी अनिल पारखे यांच्या शेतीला भेट देऊन तेथील उपक्रमांची पाहणी केली. शेती, पर्यावरण संवर्धन आणि ग्रामविकासाच्या क्षेत्रात स्थानिक पातळीवर राबविण्यात येणाऱ्या विविध प्रयत्नांची त्यांनी माहिती घेतली.

या क्षेत्र भेटीदरम्यान जिल्हाधिकारी मित्तल यांनी ग्रामस्थांशी संवाद साधत त्यांच्या सूचना व अपेक्षा जाणून घेतल्या. विविध शासकीय उपक्रमांची प्रत्यक्ष अंमलबजावणी, नागरिकांचा सहभाग आणि स्थानिक पातळीवरील सकारात्मक बदल यांचा आढावा घेणे हा या भेटीचा मुख्य उद्देश होता. बालकांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी माता, पिता आणि संपूर्ण कुटुंबाला सक्षम करणे, तसेच ग्रामविकासासाठी स्थानिक पातळीवरील चांगल्या उपक्रमांना प्रोत्साहन देणे, या दृष्टीने ही क्षेत्रभेट महत्त्वपूर्ण ठरली.

दुष्काळात जनावरांच्या चाऱ्याचा आधारही संकटात; रात्री वीज द्या, तळेगावकरांची मागणी!

मंठा । प्रतिनिधी

मंठा तालुक्यातील तळेगाव येथे निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना जनावरांसाठी चारा उपलब्ध करून देताना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यातच शेती परिसरात रात्रीच्या वेळी वीजपुरवठा नसल्याने चारा पिकांचे वन्यप्राण्यांकडून नुकसान होत असून, शेतकऱ्यांची मोठी गैरसोय होत आहे. त्यामुळे रात्रीच्या वेळी किमान सिंगल फेज वीजपुरवठा सुरू करण्यात यावा, अशी मागणी तळेगाव येथील नागरिकांनी महावितरणच्या सहाय्यक अभियंत्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

याबाबत १८ नोव्हेंबर २०२६ रोजी मंठा येथील महावितरण उपविभागाच्या सहाय्यक अभियंत्यांना निवेदन सादर करण्यात आले आहे. निवेदनानुसार, सध्या संपूर्ण परिसरात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली असून, शेतातील उपलब्ध पाण्याच्या आधारावर शेतकरी जनावरांसाठी साळू, मका तसेच इतर चारा पिकांची लागवड करीत आहेत. मात्र, रात्रीच्या वेळी शेती परिसरात वीजपुरवठा नसल्याने रानडुक्कर, रोही आणि सायाळ यांसारखे वन्यप्राणी चारा पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान करीत आहेत.

शेती परिसरात अंधार असल्यामुळे वन्यप्राण्यांचा वावर लक्षात येत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना पिकांचे संरक्षण करणेही कठीण झाले आहे. दुसरीकडे शासनाकडून जनावरांसाठी चारा लागवडीच्या विविध योजना राबविल्या जात असल्या, तरी उपलब्ध पाण्यावर घेतलेल्या चारा पिकांचे संरक्षण करण्यासाठी वीजपुरवठा नसणे ही मोठी अडचण ठरत आहे. दुष्काळाच्या संकटात जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न अधिक गंभीर होऊ नये आणि शेतकऱ्यांनी कष्टाने घेतलेल्या चारा पिकांचे नुकसान टाळता यावे, यासाठी रात्रीच्या वेळी शेती परिसरात किमान सिंगल फेज वीजपुरवठा सुरू करण्यात यावा, अशी आग्रही मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. या निवेदनाच्या प्रती जिल्हाधिकारी, जालना आणि तहसीलदार, मंठा यांनाही देण्यात आल्या आहेत. आता महावितरण प्रशासन या मागणीची दखल घेऊन तळेगावच्या शेतकऱ्यांना दिलासा देणार का, याकडे परिसरातील शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

जिल्ह्यातील युवकांना कौशल्य प्रशिक्षण; रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार

जालना । प्रतिनिधी

जिल्ह्यातील युवकांना रोजगाराभिमुख कौशल्य प्रशिक्षण देऊन रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या अधिकाधिक संधी उपलब्ध करून देण्यासाठी सन २०२६-२७ या वर्षात विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. या माध्यमातून जिल्ह्यातील १ हजार ३८० युवकांना १० विविध क्षेत्रांतील २४ अभ्यासक्रमांद्वारे कौशल्य प्रशिक्षण देण्याचे नियोजन करण्यात आले आहे. यामुळे युवकांना उद्योगांच्या गरजेनुसार कौशल्य प्राप्त करून रोजगाराच्या संधी मिळण्यास मदत होणार आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या अध्यक्षतेखाली कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता जिल्हा कार्यकारी समितीची बैठक आयोजित करण्यात



आली होती. या बैठकीत जिल्ह्यातील कौशल्य विकास कार्यक्रमांचा आढावा घेऊन आगामी वर्षातील प्रशिक्षण उपक्रम आणि रोजगारनिर्मितीबाबत महत्त्वपूर्ण नियोजन करण्यात आले. यावेळी बैठकीस कौशल्य विकास विभागाचे सहायक आयुक्त जी पी चिमणकर, कौशल्य विकास विभागाचे उप आयुक्त विद्या शितोळे, मनपा उपआयुक्त नंदा गायकवाड, जिल्हा अग्रणी बँकेचे व्यवस्थापक एम.एच. केदार, उद्योजक सुनील रायठठा आदींची उपस्थिती होती.

जालना ड्राय पोर्टच्या माध्यमातून भविष्यात उपलब्ध होणाऱ्या रोजगाराच्या संधी लक्षात घेऊन लॉजिस्टिक क्षेत्रातील १८० उमेदवारांना विशेष प्रशिक्षण देण्यात येणार आहे. तसेच रेशीम उद्योगाला चालना देण्यासाठी 'कोकून टू क्लॉथ' या उपक्रमांतर्गत ४६० उमेदवारांना प्रशिक्षण देण्याचे नियोजन आहे. या प्रशिक्षणामुळे रेशीम उत्पादनापासून वस्त्रनिर्मितीपर्यंतच्या विविध प्रक्रियांमध्ये स्थानिक युवकांना कौशल्य विकसित करण्याची संधी मिळणार आहे.

साधनांचा अभ्यास करण्यासाठी 'जालना डिस्ट्रिक्ट स्किल अँड लाईव्हलीहूड सेन्सस' हा उपक्रम राबविण्याचे प्रस्तावित आहे. या अंतर्गत जिल्ह्यातील सुमारे ७० हजार कुटुंबांचे सर्वेक्षण करण्यात येणार आहे. या सर्वेक्षणातून जिल्ह्यातील कौशल्य व रोजगारविषयक गरजांची माहिती संकलित करून त्यानुसार प्रशिक्षण आणि रोजगाराभिमुख उपक्रमांचे नियोजन करण्यास मदत होणार आहे. जिल्ह्यातील युवकांना स्थानिक उद्योगांच्या गरजेनुसार प्रशिक्षण देणे, उद्योजकतेला प्रोत्साहन देणे आणि स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण करणे, हा या उपक्रमांचा प्रमुख उद्देश आहे. विशेषतः रेशीम उद्योगाच्या विकासातून 'जालनाई सिल्क' या ब्रँडला चालना देण्यासह स्थानिक पातळीवर रोजगारनिर्मितीचे नवे पर्याय उपलब्ध करून देण्याचा जिल्हा प्रशासनाचा प्रयत्न आहे.

धुळे येथे महायोगोत्सव २०२६ उत्साहात संपन्न!

जालना । प्रतिनिधी

महाराष्ट्र योगशिक्षक संघाच्या वतीने शनिवार, दिनांक १४ व रविवार, दिनांक १५ नोव्हेंबर २०२६ रोजी धुळे येथील प्रसिद्ध श्री स्वामीनारायण मंदिरात आयोजित करण्यात आलेला दोन दिवसीय महायोगोत्सव २०२६ अत्यंत उत्साहात व जल्लोषपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

महाराष्ट्र योगशिक्षक संघाचे संस्थापक अध्यक्ष डॉ. मनोज निलपवार, नियोजन समिती अध्यक्ष प्रसाद कुलकर्णी, कार्याध्यक्ष डॉ. कृणाल महाजन, राज्य प्रमुख क्रीडा विभाग राहुल येवला, राज्य कोषाध्यक्ष संतोष खरटमोल आणि योग फाउंडेशनचे सचिव अर्जुन शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. महाराष्ट्र योगशिक्षक संघ गेल्या अनेक वर्षांपासून राज्यातील योगशिक्षकांच्या हितासाठी आणि योगक्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी कार्यरत आहे. योगशिक्षकांच्या



विविध समस्या, अडचणी व प्रश्न समजून घेऊन त्यांना योग्य मार्गदर्शन करणे, तसेच त्यांच्या हक्कांसाठी संघटितपणे प्रयत्न करणे हे संघटनेचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

राज्यातील सर्व योगशिक्षकांना एकाच व्यासपीठावर आणणे, विविध जिल्ह्यांतील शिक्षकांमध्ये विचारांची देवाणघेवाण घडवून आणणे, परस्पर परिचय व संघटनात्मक एकात्मता वाढविणे आणि योगक्षेत्राच्या विकासासाठी सामूहिक दिशा निश्चित करणे, हा महायोगोत्सव आयोजनामागील मुख्य उद्देश आहे. या दोन दिवसीय महायोगोत्सवात महाराष्ट्रात स्वतंत्र योग आयोग स्थापन करण्यात यावा, असा महत्त्वपूर्ण ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला. योगक्षेत्रातील नामवंत प्राचार्य व तज्ज्ञांची मार्गदर्शनपर व्याख्याने आयोजित करण्यात आली होती. तसेच प्रमाणित योग खेळाडूंनी विविध योगासनांची आकर्षक व कौशल्यपूर्ण प्रात्यक्षिके सादर करून उपस्थितांची मने जिंकली. या महोत्सवाला संपूर्ण महाराष्ट्रातून सुमारे ९०० योगशिक्षक व संघटनेचे सदस्य उपस्थित होते. यावेळी मुंबई जिल्हा संघटनेच्या कार्याचे विशेष कौतुक करण्यात आले.

महोत्सवातील महत्त्वपूर्ण संघटनात्मक निर्णयानुसार राज्य कोषाध्यक्ष संतोष खरटमोल यांच्यावर सन २०२७-२८ या वर्षासाठी राज्य कार्याध्यक्ष पदाची जबाबदारी सोपविण्यात आली. तसेच डॉ श्रीकांत वाढिले सर यांची उत्तर महाराष्ट्र विभाग प्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आली. या प्रसंगी फाउंडेशनचे सदस्य चंद्रकांत अवचार, सदानंद वाली, विनायक बारापत्रे, अशोक पाटील आणि उत्तमराव आहिरे तसेच. अनंत कांबळे सातारा, चंद्रज्योती दळवी पुणे, मनीष देशमुख अमरावती, सुपर्णा पाल राज्य महासू यांची विशेष उपस्थिती होती. या महायोगोत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी धुळे जिल्हा अध्यक्षा सौ. मनीषा चौधरी, संदीप कुलकर्णी, विश्वनाथजी सोमवंशी, विजयजी पाटील, आनंदजी जगदेव, नरेंद्र गांगुर्डे तसेच धुळे जिल्ह्यातील सर्व पदाधिकारी, योगशिक्षक आणि सदस्यांनी अथक परिश्रम घेतले.

जयपूर परिसरात काकड आरतीचा भक्तिमय गजर!

मंठा । प्रतिनिधी

मंठा तालुक्यातील जयपूर परिसरात सध्या पहाटेच्या रामप्रहरी भक्तिमय वातावरण अनुभवायला मिळत आहे. गावोगावी मंदिरांमध्ये दररोज पहाटे काकड आरतीचा गजर होत असून, भजन, हरिनाम आणि टाळ-मृदंगाच्या निनादाने परिसरातील वातावरण भक्तिमय बनत आहे. जयपूर येथील हनुमान मंदिर, वझर सरकटे येथील धनेश्वर संस्थान तसेच केहाळ वडगाव येथील विठ्ठल-रुक्मिणी सभागृह येथे दररोज पहाटे काकड आरतीचे आयोजन केले जात आहे.

या धार्मिक उपक्रमात ग्रामस्थ, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि तरुण भक्त मोठ्या श्रद्धेने सहभागी होत आहेत. पहाटेच्या शांत वातावरणात देवाच्या नामस्मरणाने दिवसाची सुरुवात करण्याची ही परंपरा ग्रामस्थांमध्ये आध्यात्मिक ऊर्जा आणि सामाजिक एकोपा निर्माण करणारी ठरत आहे. काकड आरतीच्या माध्यमातून भक्ती, श्रद्धा आणि संस्कृतीचा वारसा जपण्याचे काम जयपूर परिसरातील ग्रामस्थांकडून केले जात आहे. रामप्रहरी घुमणारा आरतीचा निनाद आणि हरिनामाचा गजर परिसरातील धार्मिक वातावरण अधिकच प्रसन्न करत आहे.

परभणी मनपाच्या सभेत ६२ पैकी ६१ विषय मंजूर; सहा तास रंगली चर्चा

१०० खाटांचे आयुष हॉस्पिटल, वारकरी भवनासाठी जागा आणि रस्ते-चौकांच्या नामकरणाचे ठराव मंजूर

परभणी । प्रतिनिधी

महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा बुधवार (दि. १७) बी. रघुनाथ सभागृहात महापौर सय्यद इकबाल यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. तब्बल सहा तास चाललेल्या या सभेत चर्चेसाठी ठेवण्यात आलेल्या ६२ विषयांपैकी ६१ विषयांना मंजुरी देण्यात आली, तर एका विषयावर अधिक माहिती घेऊन तो पुढील सभेत ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला. शहरातील विकासकामे, नागरी सुविधा, रस्ते, स्वच्छता आणि विविध प्रलंबित प्रश्नांवर यावेळी सविस्तर चर्चा झाली. उपमहापौर गणेश देशमुख, आयुक्त नितीन नार्वेकर आणि नगरसचिव विकास रत्नपारखी यांची उपस्थिती होती.

सभेत शहरातील विविध रस्ते आणि चौकांच्या नामकरणाचे ठराव एकमताने मंजूर करण्यात आले. दुष्काळी रस्त्याला



राजर्षी शाहू महाराज रस्ता, परभणी-जिंतूर रोडवरील नवीन बायपासजवळील चौकाला शिवरत्न जीवा महाले चौक, तर परभणी-नांदखेडा रोडवरील बायपास पुलाला सद्गुरू श्री राम भरोसे महाराज संस्थान मार्ग असे नाव देण्याचे ठरले. तसेच विनायकनगरमधील आजम चौक दर्गा रोड ते जुना पेडगाव रोडला जोडणाऱ्या रस्त्याला माजी आमदार अब्दुल रहमान खान मार्ग असे नामकरण करण्यास मंजुरी देण्यात आली. वसमत रोडवरील कारेगाव चौकाला संत तुकाराम चौक असे नाव देण्याची मागणीही करण्यात आली.

शहरात १०० खाटांचे आयुष हॉस्पिटल उभारण्यासाठी केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठविण्याचा ठराव स्थायी समिती सभापती प्रतिभा अतुल सरोदे यांनी मांडला. खासदार संजय जाधव निधीसाठी पाठपुरावा करतील, अशी माहिती देण्यात आली. हा ठराव एकमताने मंजूर झाला. तसेच शहरात वारकरी भवन उभारण्यासाठी जागा निश्चित करण्याचा मुद्दा गटनेते विजय जामकर यांनी उपस्थित केला. वसमत रोड किंवा गंगाखेड रोडवरील दिंडी मार्गालगत जागा उपलब्ध करून देण्याची मागणी नगरसेविका अंबिका डहाळे आणि सुनील देशमुख यांनी केली.

घरपट्टीसंदर्भातील अनधिकृत बांधकामांचा प्रश्न नगरसेवक सुनील देशमुख यांनी उपस्थित केला. स्वच्छ महाराष्ट्र अभियानांतर्गत सार्वजनिक शौचालयांच्या दुरुस्तीच्या कामांसाठी महापालिकेचा ३० टक्के स्वहिस्सा उपलब्ध करून देण्यासही मंजुरी देण्यात आली. प्रत्येक कामासाठी साडेसात लाख रुपये खर्च अपेक्षित असून, पाहणीनंतर प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविण्यात येणार आहे.

दरम्यान, सर्वे क्रमांक ५७९/१ मधील शासकीय संपादित जमिनीवरील मालमत्ता क्रमांक ११४७ संदर्भात चौकशी समिती नियुक्त केल्याची माहिती आयुक्त नार्वेकर यांनी दिली. त्यामुळे या विषयावरील निर्णय पुढील सभेपर्यंत स्थगित ठेवण्यात आला. पारदेश्वर मंदिर परिसरातील नालीचे काम पूर्ण झाल्यानंतरच ठेकेदाराचे बिल अदा करावे, अशी मागणी नगरसेवक व्यंकट डहाळे यांनी केली. आयुक्तांनी संबंधित ठेकेदाराला काम लवकर पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. सभेत विजय जामकर, गुलमीर खान, सय्यद समीर, विश्वजीत बुधवंत, सागर गांगाळे, मीनाताई वरपूडकर यांच्यासह अनेक नगरसेवकांनी विविध प्रश्नांवर भूमिका मांडली. शहराच्या विकासाशी संबंधित महत्त्वपूर्ण विषयांना मंजुरी मिळाल्याने ही सभा चर्चेचा विषय ठरली.

महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगमित्र

संतोष सोनवणे (लातूर जिल्हा प्रतिनिधी)
मो.9673158719

PRGI.No.- MHMAR/26/A2511

लातूर जिल्हा आवृत्ती — गुरुवार दि.१९ नोव्हेंबर २०२६ — पान नं.४



सोलार प्लांटमधील साहित्य चोरी करणाऱ्या टोळीचा स्थानिक गुन्हे शाखेकडून पर्दाफाश!

दोन पोलीस ठाण्यांतील चोरीचे गुन्हे उघड; ६ लाख ६० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त

लातूर । प्रतिनिधी

लातूर जिल्ह्यातील सोलार प्लांटमधील साहित्य चोरी करून त्याची विक्री करणाऱ्या टोळीचा स्थानिक गुन्हे शाखा, लातूरच्या पथकाने पर्दाफाश केला आहे. या कारवाईत एका आरोपीला ताब्यात घेण्यात आले असून, त्याच्याकडून चोरीच्या साहित्याच्या विक्रीतून मिळालेली १ लाख ६० हजार रुपयांची रोख रक्कम आणि गुन्ह्यांसाठी वापरण्यात आलेली ५ लाख रुपये किमतीची टाटा मांझा कार, असा एकूण ६ लाख ६० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या कारवाईमुळे पोलीस ठाणे किल्लारी व पोलीस ठाणे कासार शिरसी हद्दीतील चोरीचे दोन गुन्हे उघडकीस आले आहेत.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, मालमत्तेविषयक गुन्ह्यांचा तपास करून चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्याच्या अनुषंगाने मा. पोलीस अधीक्षक अमोल तांबे व अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांनी पथकास आवश्यक सूचना दिल्या होत्या.

त्यानुसार दिनांक १७ नोव्हेंबर २०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक लातूर परिसरात गुन्हेगारांची माहिती घेत



असताना बोरगाव काळे परिसरात गोपनीय बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, लातूर-मुरुड बायपास रोडवर MH-03-W-2512 क्रमांकाची टाटा कंपनीची मांझा कार संशयितरित्या उभी आहे. मिळालेल्या माहितीची खात्री करून पथकाने वाहनचालकास पोलिसांनी ताब्यात घेतले. त्याची चौकशी केली असता त्याने आपले नाव १) नवनाथ उर्फ बबलू लाला पवार (वय २६, रा. भैरवनाथ साखर कारखाना, शिवशक्तीनगर, वाशी, जि. धाराशिव) असे सांगितले. वाहनाची झडती घेतली असता त्यामध्ये एका पिशवीत रोख रक्कम मिळून आली. याबाबत अधिक विचारपूस केली असता, त्याचे आणखीन साथीदार २) पिंटू मधु चव्हाण ३) संतोष अप्पा चव्हाण ४) पोपट उर्फ पोप्या सर्जेराव काळे यांच्यासह मिळून औसा तालुक्यातील लामजना व निलंगा तालुक्यातील सिंनगाळ परिसरातील गावालगत असलेल्या सोलार प्लांटमधील साहित्य चोरी केल्याची माहिती दिली. चोरी केलेल्या साहित्याची विक्री केल्यानंतर त्यातून मिळालेली रक्कम आपापसात वाटून घेतल्याचेही त्याने सांगितले.

पुढील पडताळणी केली असता, या चोरीच्या घटनांप्रकरणी पोलीस ठाणे किल्लारी येथे गुरनं. ३२४/२०२६ कलम ३०३(२), ३२४(५) भा.न्या.सं. तसेच पोलीस ठाणे कासार शिरसी येथे गुरनं. २५६/२०२६ कलम ३०३(२), ३२४(५) भा.न्या.सं. अन्वये गुन्हे दाखल असल्याचे निष्पन्न झाले. या कारवाईत पोलिसांनी दोन्ही गुन्ह्यांशी संबंधित असल्याचे निष्पन्न झालेली एकूण १ लाख ६० हजार रुपयांची रोख रक्कम तसेच गुन्ह्यांसाठी वापरण्यात आलेली टाटा मांझा कार असा एकूण ६,६०,००० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

ताब्यात घेतलेल्या आरोपीला पुढील तपास व कायदेशीर कारवाईसाठी पोलीस ठाणे किल्लारी येथे हजर करण्यात आले आहे. अन्य तीन आरोपींचा शोध सुरू असून, या गुन्ह्यांच्या अनुषंगाने पुढील तपास करण्यात येत आहे. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक अमोल तांबे व अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वाखाली सपोनि पांडुरंग माने, पोउपनि राजाभाऊ घाडगे, पोलीस अंमलदार संजय कांबळे, युवराज गिरी, प्रदीप स्वामी, राजेश कंचे, मोहन सुरवसे, सिद्धेश्वर मदने, सूर्यकांत कलमे, जमीर शेख, राहुल कांबळे, काकासाहेब बोचरे, पाराजी पुठेवाड, तुळशीराम बरुरे, शैलेश सुडे, हरी पतंगे, रामदास बाचीफळे यांच्या पथकाने केली.

डोंगरशेळकी ग्रामपंचायतीसमोर मारोती केंद्रे यांचे बेमुदत उपोषण सुरू; प्रशासनाकडून दखल

कथित अनियमिततेच्या निष्पक्ष चौकशीसह बंद आरओ केंद्र सुरू करण्याची मागणी; पोलिस प्रशासन उपोषण स्थळी भेट, वैद्यकीय पथकाकडून आरोग्य तपासणी

उदगीर । पाटील मनेश

डोंगरशेळकी ता.उदगीर येथील ग्रामपंचायतीच्या कारभारातील कथित अनियमिततेची निष्पक्ष चौकशी करण्यात यावी आणि गेल्या अनेक वर्षांपासून बंद असलेले आरओ (शुद्ध पिण्याचे पाणी) केंद्र तातडीने सुरू करावे, या प्रमुख मागण्यांसाठी डोंगरशेळकी येथील मारोती केंद्रे यांनी बुधवार, दि.१८ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजल्यापासून ग्रामपंचायत कार्यालयासमोर बेमुदत उपोषण सुरू केले आहे. या आंदोलनाची आता प्रशासनाने दखल घेतली असून उपोषणस्थळी पोलीस प्रशासनाने भेट दिली, तर वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या पथकाने उपोषणकर्त्यांची आरोग्य तपासणी केली.

ग्रामपंचायतीच्या कारभारात झालेल्या कथित अनियमिततेची सखोल व निष्पक्ष चौकशी करून संबंधित दोषींवर नियमानुसार कारवाई करावी, अशी उपोषणकर्ते मारोती केंद्रे यांची पहिली मागणी आहे. तसेच गावातील नागरिकांना स्वच्छ व शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे, यासाठी अनेक वर्षांपासून बंद अवस्थेत असलेले आरओ केंद्र तातडीने सुरू करण्यात यावे, अशी दुसरी महत्त्वाची मागणी त्यांनी प्रशासनासमोर मांडली आहे.

पोलिस प्रशासनाची उपोषणस्थळी भेट

बुधवारी उपोषण सुरू झाल्यानंतर पोलीस प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी



आंदोलनस्थळी भेट देऊन पाहणी केली. यावेळी उपोषणकर्ते मारोती केंद्रे यांच्याशी चर्चा करून आंदोलनाची कारणे, मागण्या आणि सद्यस्थितीची माहिती घेतली. ग्रामपंचायतीतील कथित अनियमिततेची चौकशी आणि बंद आरओ केंद्र सुरू करण्याबाबत प्रशासनाने गांभीर्याने लक्ष घालावे, अशी भूमिका केंद्रे यांनी यावेळी मांडली. बेमुदत उपोषणाच्या पार्श्वभूमीवर वैद्यकीय अधिकाऱ्यांचे पथकही उपोषणस्थळी दाखल झाले. पथकाने मारोती केंद्रे यांच्या प्रकृतीची तपासणी करून त्यांच्या आरोग्याची पाहणी केली. तसेच प्रकृतीची काळजी घेण्याबाबत आवश्यक वैद्यकीय सूचना दिल्या. बेमुदत उपोषणामुळे त्यांच्या प्रकृतीकडेही लक्ष ठेवले जात आहे.

या आंदोलनामागे कोणताही वैयक्तिक स्वार्थ नसून गावातील सार्वजनिक प्रश्नांना न्याय मिळावा, हा उद्देश असल्याचे मारोती केंद्रे यांनी स्पष्ट केले. ग्रामपंचायतीच्या कारभारात पारदर्शकता असावी, नागरिकांच्या पैशांचा योग्य विनियोग व्हावा आणि गावकऱ्यांना शुद्ध पिण्याचे पाणी मिळावे, या मूलभूत अपेक्षांसाठी आपण हा लढा उभारल्याचे त्यांनी सांगितले. प्रशासनाने या दोन्ही मागण्यांची गांभीर्याने दखल घेऊन निष्पक्ष चौकशीची प्रक्रिया सुरू करावी आणि बंद आरओ केंद्र पुन्हा कार्यान्वित करण्यासाठी ठोस पावले उचलावीत, अशी त्यांची अपेक्षा आहे. मागण्यांवर समाधानकारक निर्णय होईपर्यंत बेमुदत उपोषण सुरू ठेवण्याचा निर्धारही त्यांनी व्यक्त केला आहे.

दरम्यान, उपोषणस्थळी पोलीस प्रशासनाची भेट आणि वैद्यकीय पथकाकडून आरोग्य तपासणी झाल्याने या आंदोलनाकडे प्रशासनाचे लक्ष वेधले गेले आहे. मात्र, उपोषणकर्त्यांच्या दोन्ही प्रमुख मागण्यांवर प्रशासन नेमकी कोणती भूमिका घेते आणि त्यावर काय कार्यवाही होते, याकडे आता डोंगरशेळकीसह परिसरातील ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे. मागण्या मान्य होईपर्यंत लढा सुरूच राहील. न्याय मिळेपर्यंत आपला आवाज थांबणार नाही, असा निर्धार मारोती केंद्रे यांनी व्यक्त केला आहे.

नकाशाच्या प्रतीसाठी ५०० रुपयांची लाच, अहमदपूर भूमी अभिलेख कार्यालयातील भूकरमापक जाळ्यात

लातूर । प्रतिनिधी

चतुःसीमा नकाशाची प्रमाणित प्रत देण्यासाठी ५०० रुपयांची लाच स्वीकारणाऱ्या अहमदपूर येथील भूमी अभिलेख कार्यालयातील भूकरमापकाला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने सापळा रचून पकडले. अक्षय ओमप्रकाश बुगाडे (वय ३२) असे आरोपी लोकसेवकाचे नाव – आहे.

तक्रारदार हे अहमदपूर तालुक्यातील लाजणी येथील शेतकरी आहेत. त्यांच्या शेतजमिनीच्या चतुःसीमा नकाशाची आवश्यकता असल्याने त्यांनी भूमी अभिलेख कार्यालयात अर्ज केला होता. या नकाशाची प्रमाणित प्रत देण्यासाठी भूकरमापक अक्षय बुगाडे याने तक्रारदाराकडे ५०० रुपयांची लाच मागितली होती. याबाबत तक्रारदाराने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केली. त्यानुसार विभागाने १६ नोव्हेंबर रोजी लाच मागणीची पडताळणी केली. त्यानंतर अहमदपूर येथील भूमी अभिलेख कार्यालयात सापळा रचण्यात आला.

यावेळी आरोपी बुगाडे याने तक्रारदाराकडून ५०० रुपये स्वीकारले. त्याचवेळी पथकाने त्याला लाचेच्या रकमेसह पकडले. या प्रकरणी अहमदपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांच्या मार्गदर्शनाखाली लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने केली. नागरिकांनी शासकीय कामासाठी कोणी लाचेची मागणी केल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

आधुनिक भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू : प्राचार्य डॉ.रामकिशन मांजरे

उदगीर । पाटील मनेश

छत्रपती शिवाजीराजे महाविद्यालयात स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांची जयंती साजरी करण्यात आली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रामकिशन मांजरे यांनी पंडित नेहरूजींच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या प्रसंगी त्यांनी आपल्या मनोगतातून पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या कार्यावर प्रकाश टाकताना म्हटले की, पंडित जवाहरलाल नेहरूंचा जन्म १४ नोहेंबर १९८९ मध्ये अलाहाबाद, उत्तर प्रदेशमध्ये झाला. त्यांचे वडील मोतीलाल नेहरू हे प्रसिद्ध वकील होते.

पंडित जवाहरलाल नेहरुंच्या लहान मुलांवरील अपार प्रेमामुळे त्यांचा जन्म दिवस संपूर्ण भारतात बालदिन 'म्हणूनही साजरा केला जातो. त्यांनी केंब्रिज विद्यापीठातून नैसर्गिक विज्ञानात पदवी प्राप्त केली. १९१२ मध्ये भारतात परतल्यानंतर ते राजकारणात सक्रिय झाले. त्यांनी असहकार चळवळ, सविनय कायदेभंग, मिठाचा सत्याग्रह व तसेच भारत छोडो आंदोलन सारख्या प्रमुख चळवळीमध्ये सक्रिय सहभाग घेतला. भारताचे पहिले पंतप्रधान म्हणून १५ ऑगस्ट १९४७ रोजी पदभार स्वीकारुन आधुनिक भारताच्या निर्मितीत मोलाचे योगदान दिले. संसदीय लोकशाही, धर्मनिरपेक्षता, विज्ञान, शिक्षण, औद्योगिकरण, यांचा पाया रचला. त्यांच्याच काळात आय आयटी, मोठे सिंचन प्रकल्प, अणुऊर्जा केंद्र स्थापन झाले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक सहसंयोजक प्रा.डॉ. ज्ञानोबा मुळे यांनी केले. या कार्यक्रमास प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपास्थित होते. हा कार्यक्रम जयंती समितीच्या वतीने घेण्यात आला.

रामदरा तलावातून लातूर शहरासाठी शाश्वत पाणीपुरवठा योजना राबविण्याची मागणी

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांचे निवेदन

मुंबई । प्रतिनिधी

भारतीय जनता पक्षाच्या महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन लातूर शहराच्या कायमस्वरूपी पाणी प्रश्नाच्या निराकरणासाठी तुळजापूर तालुक्यातील रामदरा तलावातून लातूर शहरासाठी शाश्वत पाणीपुरवठा योजना राबविण्याबाबतचे निवेदन सादर केले. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, लातूर शहराची वाढती लोकसंख्या आणि पाण्याची वाढती मागणी लक्षात घेता शहरासाठी कायमस्वरूपी व शाश्वत पाणीपुरवठा स्रोत उपलब्ध होणे अत्यावश्यक आहे. मागील काही वर्षांत अनियमित पर्जन्यमान, कमी पाऊस तसेच वारंवार उद्भवणाऱ्या दुष्काळी परिस्थितीमुळे लातूरकरांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत



आहे. सन २००२, २००४, २०१२, २०१६ आणि २०२५ या वर्षांमध्ये उद्भवलेल्या पाणीटंचाईच्या परिस्थितीचा नागरिकांना मोठा फटका बसला आहे.

यावर दीर्घकालीन उपाय म्हणून तुळजापूर तालुक्यातील रामदरा तलाव व उजनी जलाशयातून लिफ्ट इरिगेशनद्वारे उपलब्ध होणाऱ्या ७ टीएमसी पाण्याचा वापर करून रामदरा तलाव ते लातूर शहर अशी स्वतंत्र पाणीपुरवठा पाइपलाइन योजना राबविण्याचा प्रस्ताव शासनाने विचारात घ्यावा, अशी मागणी त्यांनी केली आहे. या योजनेअंतर्गत उपलब्ध पाणीसाठा, उपसा क्षमता, आवश्यक पाणी आरक्षण, पंपिंग यंत्रणा, पाइपलाइनची लांबी व व्यास तसेच आवश्यक विद्युत व्यवस्था यांचा अभ्यास करून लवकरात लवकर कार्यवाही करण्यात यावी, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

लातूर शहराचा पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सोडविण्यासाठी रामदरा तलावातून पाणीपुरवठा योजना राबविण्याबाबत मुख्यमंत्री महोदयांनी सकारात्मक प्रतिसाद देत ही योजना राबविण्याकरिता आवश्यक माहिती अहवाल देण्याबाबत चे प्रशासनाला निर्देश दिले आहेत असे डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी माध्यमांशी बोलत असताना सांगितले आहे.

लातूर व रेणापूरच्या 'आधार' लघुपटाची राष्ट्रीय स्तरावर झेप!

शिवप्रहार लघुपट महोत्सव २०२६ च्या अंतिम फेरीसाठी देशभरातील ९६ लघुपटांतून अधिकृत निवड; लातूर जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा

लातूर । प्रतिनिधी

लातूर जिल्ह्यातील रेणापूर तालुक्यात तयार झालेल्या 'आधार' या लघुपटाने राष्ट्रीय स्तरावर आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. कसरत मातीची फिल्म्स प्रोडक्शन निर्मित आणि बबन हाटकर दिग्दर्शित या लघुपटाची माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब व बच्चू कडू साहेब यांच्या अखिल भारतीय प्रहार चित्रपट संघटनेच्या वतीने आयोजित 'शिवप्रहार लघुपट महोत्सव २०२६' या स्पर्धेच्या अंतिम फेरीसाठी निवड झाली आहे. देशभरातून अंतिम फेरीसाठी निवड झालेल्या ९६ लघुपटांमध्ये 'आधार' या लघुपटाला २० वा क्रमांक मिळाला आहे. त्यामुळे लातूर व रेणापूरच्या कलावंतांसह चित्रपट क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या लघुपटाची कथा, पटकथा व गीतलेखन दौलत जाधव यांनी केले असून दिग्दर्शनाची जबाबदारी बबन हाटकर यांनी सांभाळली आहे. छायांकन (डीओपी) सचिन इंगळे यांनी, तर संकलन राम जोगी यांनी केले आहे. या लघुपटामध्ये दौलत जाधव, पल्लवी वाघमारे, गौरी टेकाळे, मयुरी जाधव, तीर्था केंद्रे, बबन हाटकर, वीरसेन भोसले, जीवन वाघमारे, शिवाजी रूपणावर, शिवाजी काळे, रितेश गायकवाड, तुळशीराम गायकवाड, रुक्मिण प्रकाश चाटे, सरोजिनी टेकाळे, जाधव मॅडम, ढगे सर आदी कलाकारांनी भूमिका साकारल्या आहेत. तसेच संत भगवान बाबा विद्यालय, डोंगर पिंपळा येथील इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांनीही उत्कृष्ट अभिनयातून लघुपटाला विशेष रंगत आणली आहे.

या लघुपटाचा विषय अत्यंत संवेदनशील आणि समाजाला प्रेरणा देणारा आहे. गरीब कुटुंबात जन्मलेल्या मुलीची शिक्षणासाठीची धडपड, तिच्या शिक्षणासाठी आई-वडिलांनी घेतलेले कष्ट, त्यांची तळमळ, त्याग आणि मुलीने आपल्या यशाचे श्रेय आई-वडिलांना देण्याची भावना याचे प्रभावी चित्रण या लघुपटातून करण्यात आले आहे. आई-वडिलांचे प्रेम, त्यांचे संस्कार आणि संघर्ष हाच मुलांच्या आयुष्यातील खरा आधार असतो, हा महत्त्वपूर्ण संदेश 'आधार' या लघुपटातून देण्यात आला आहे. लघुपटाच्या निर्मितीसाठी संत भगवान बाबा विद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष यांनी शाळा उपलब्ध करून देत मोलाचे सहकार्य केले. तसेच वेळोवेळी महेश जाधव यांनीही सहकार्य केले. या सर्व सहकार्यांबद्दल निर्मिती टीमने कृतज्ञता व्यक्त केली आहे.

ग्रामीण भागातील कलाकार, तंत्रज्ञ आणि विद्यार्थ्यांना सोबत घेऊन तयार झालेल्या 'आधार' या लघुपटाने राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेच्या अंतिम फेरीत स्थान मिळवणे ही लातूर जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब आहे. या यशाबद्दल लघुपटाचे निर्माते, दिग्दर्शक, लेखक, कलाकार, तंत्रज्ञ आणि सहभागी विद्यार्थ्यांचे सर्व स्तरांतून कौतुक व अभिनंदन होत आहे. ग्रामीण भागातील प्रतिभेला राष्ट्रीय व्यासपीठ मिळवून देणारा 'आधार' हा लघुपट निश्चितच अनेकांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे!

परिवर्तन पॅनलच्या सर्व विजयी शिलेदारांचे मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडून अभिनंदन

लातूर । प्रतिनिधी

लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक संचालक पदाच्या निवडणुकीत रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज परिवर्तन पॅनलच्या विजयी उमेदवारांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांची आज बुधवारी मुंबईत भेट घेऊन आशीर्वाद घेतले असता मुख्यमंत्री महोदयांनी परिवर्तन पॅनलच्या विजयी सर्व शिलेदारांचे अभिनंदन करून सहकार क्षेत्रातील लोकाभिमुख कामकाजासाठी शुभेच्छा दिल्या.

लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळासाठी नुकतीच निवडणूक झाली. वर्षानुवर्ष ठराविक मतदार नियुक्त करून काँग्रेसने जिल्हा बँकेवर सत्ता मिळविली या एकाधिकार आणि घराणेशाही विरुद्ध महायुती नेत्यांच्या नेतृत्वात रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज परिवर्तन पॅनलच्या माध्यमातून लढत दिली. या अटीतटीच्या लढतीत अरविंद पाटील निलंगेकर,



ऋषिकेश रमेशआप्पा कराड, भगवानराव पाटील तळेगावकर आणि अतुल गंभीरे यांनी मोठा विजय संपादन केला तर सौ. शोभाताई अभिमन्यू पवार या बिनविरोध निवडून आल्या आहेत. परिवर्तन पॅनलच्या माध्यमातून पाच जणांनी जिल्हा बँकेत दिमाखाने प्रवेश केला आहे.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांची जिल्हा बँकेच्या निवडणुकीत मिळालेल्या विजयाच्या पार्श्वभूमीवर आज बुधवारी मुंबई येथे परिवर्तन पॅनलच्या विजयी उमेदवारांनी भेट घेऊन आशीर्वाद घेतले. लातूर जिल्हा बँकेत आजपर्यंत सुरू असलेला सर्व गैरकारभार थांबवून लोकाभिमुख कारभार सुरू करून जिल्ह्यात सहकार क्षेत्र समृद्ध करू अशी ग्वाही दिली. परिवर्तन पॅनलच्या सर्व विजयी उमेदवारांचे अभिनंदन करून जिल्हा बँक लोकाभिमुख करावी विकासात्मक कामांना गती द्यावी शासन आपल्या पाठीशी आहे असे मुख्यमंत्री महोदयांनी यावेळी बोलून दाखविले. याप्रसंगी माजी मंत्री आ. संजय बनसोडे, आ. अभिमन्यू पवार यांच्यासह परिवर्तन पॅनलचे विजयी शिलेदार अरविंद पाटील निलंगेकर, ऋषिकेश रमेशआप्पा कराड, भगवानराव पाटील तळेगावकर, अतुल गंभीरे त्याचबरोबर दगडू साळुंखे, गिरीश पाटील, कपिल माकणे, भरत चामले, ॲड. ईरपतगिरे आदी होते.

औसा तालुक्यात थेंब थेंब पाण्यावर जगविलेल्या उभ्या ऊसाचे होतेय पाचट ! कारखान्याकडून ऊसतोड लांबणीवर

भादा व परिसरातील ऊस उत्पादक शेतकरी चिंताग्रस्त..!; आधीच महागाईचा सुलतानी मार त्यामध्ये आसमनीचा पडला अधिभार

औसा । बी.डी. उबाळे

औसा तालुक्यामध्ये शेतकऱ्यांनी थेंब थेंब पाणी देऊन वाढविलेल्या उभ्या उसाचे होते पाचट तर भागाव परिसरातील ऊस उत्पादक शेतकरी चिंताग्रस्त असून आधीच नागरिकांना महागाईचा सुलतानी मार सुरू असतानाच त्यामध्ये आसमानी संकटाचा आदिवार वाढल्याने शेतकरी शेतमजूर कसे जगणार अशी अत्यंत चिंताजनक परिस्थिती निर्माण झाल्याने औसा तालुक्यातील जनता सुलतानी आणि अस्मानी संकटांना त्रासून गेल्याचे चित्र सध्या औसा तालुक्यामध्ये दिसून येत आहे.

औसा तालुक्यातील भादा व परिसरातील गावांमध्ये संपूर्ण पावसाळा संपून गेला खरीप पिके वाळून गेली परंतु पावसाची प्रतीक्षा काही शेतकऱ्यांची संपली नाही आणि पिकासाठी आवश्यक असणारा पाऊस आणि पाणी हे तर पडलेच नाही यामुळे हे नैसर्गिक संकट प्रत्येक नागरिकांवर ओढवली गेली तर सध्या शासनाकडून सुलतानी मार म्हणजे दैनंदिन जीवनामध्ये आवश्यक असणाऱ्या वस्तू यांच्या



किमती गगनाला भिडल्या असून सर्व सामान्य नागरिकांनी शेतकरी यांनी दैनंदिन जीवनामध्ये आणि या महागाईच्या वातावरणामध्ये जगायचे कसे हा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. शेतकऱ्याचे हमखास असणारे ऊस पीक पाण्याअभावी उभ्या उसाचे मोठ्या प्रमाणात पाचट होत असल्याने ऊस उत्पादक शेतकरी हवालदिल झाले आहेत. दरवर्षी लाखो रुपयांचे उत्पन्न मिळवून देणारे ऊस पीक यंदा मात्र पाणीटंचाईच्या विळख्यात सापडले आहे. औसा तालुक्यासह भादा, बऱ्हाणपूर, हल्डुर्ग, समदर्गा, कोरांगळा, वरवडा, शिवली, वडजी, कवठा, काळमाथा, बोरगाव, भेटा, अंदोरा, जायफळ आणि परिसरात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाल्याने उसाला पुरेसे पाणी मिळत नसून शेतकऱ्याचा उभा ऊस पाण्याविना वाळू लागला आहे. यावर्षीचा पावसाळा पूर्णपणे कोरडाच गेल्याने पाण्याअभावी खरीप पिकांना मोठा फटका बसला असून उसाची वाढ खुंटली असून अनेक ठिकाणी ऊस पिकाचे शेकडो एकर क्षेत्रावर पाचट होत असल्याचे चित्र दिसत आहे. त्यातच वाळलेल्या उसाला साखर कारखाने घेऊन जाण्यास तयार नसल्याने शेतकऱ्यांची मोठी कोंडी झाली आहे.

औसा तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांनी सावकारी व बँकेचे कर्ज काढून आपल्या शेतात ऊस लागवड केली होती. दुष्काळात तेरावा महिना त्यात पावसाने उघडीप दिल्याने शेतकऱ्यांच्या विहीर व बोरवेलला पाणी कमी झाल्याने व पाण्यावचून वाळत चाललेला ऊस शेतात उभा वाळून जात असल्याने त्याचे पाचट होत असल्याने शेतकरी पुरताच हवालदिल झाला आहे. एकीकडे ऊस लागवड वा पिकासाठी केलेला लाखोंचा खर्च आणि दुसरीकडे हातातोंडाशी आलेले पीक डोळ्यादेखत वाळत असल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. ऊस नेता का ऊस अशी म्हणण्याची वेळ शेतकऱ्यावर आली असून या भागांमध्ये ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या या गंभीर प्रश्नाकडे संबंधित साखर कारखाने आणि प्रशासनाने लक्ष देऊन तातडीने मार्ग काढावा, अशी मागणी औसा तालुक्यातील शेतकऱ्यांकडून केली जात आहे.

महागाईचा काळ आणि दुष्काळ या दुहेरी संकटापासून या परिसरातील स्थानिक ते जिल्हास्तरापर्यंतच्या सर्वच लोकप्रतिनिधींनी आपले खंबीर पालकत्व सिद्ध करण्यासाठी शेतकरी शेतमजूर यांना महागाई आणि दैनंदिन जीवनात जगत असताना आर्थिक आणि मानसिक आधार कसा मिळेल या बाबीकडे लक्ष केंद्रित करण्याची आवश्यकता असल्याचे मत या भागातील शेतकरी शेतमजूर आणि नागरिकाकडून व्यक्त केले जात आहे.

महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगमित्र

मकसूद पटेल
जिल्हा प्रतिनिधी ९७६७७८५८५५

शेख मौला शेख उस्मान
उपसंपादक ९७६६६६४९४९

PRGI.No.- MHMAR/26/A0270

नांदेड जिल्हा आवृत्ती — गुरुवार दि.१९ नोव्हेंबर २०२६ — पान नं. ५

राष्ट्रीय महामार्गावर वाकलेल्या झाडाच्या फांद्यामुळे वाहनचालक त्रस्त; अपघाताचा धोका

उस्माननगर । प्रतिनिधी

नांदेड ते किवळा उस्माननगर मार्गे कंधार बिदरला जाणारा राष्ट्रीय महामार्गावरील दुतर्फा असलेल्या झाडाच्या फांद्या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात झुकल्या आहेत. या वाकलेल्या झाडाच्या फांद्यामुळे वाहनचालकांना वाहन चालवताना मोठा त्रास सहन करावा लागत असून वाकलेल्या फांद्यांना कट मारून पुढे जाताना अपघाताचं धोका निर्माण झाला आहे.

उस्माननगर, तेलंगवाडी, टेळकी, किवळा सिडको तसेच कंधारकडे जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गावरील दुतर्फा असलेल्या छोट्या मोठ्या झाडाच्या फांद्या रस्त्यावर झुकल्या आहेत. वाहन चालक वाहन चालवताना फांदीला कट मारताना मागून अचानक येणारे वाहन कधी जवळ येईल याचा नेम नाही. यामुळे अपघाताला आमंत्रण मिळत आहे. या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात वाहानाची संख्या जास्त असल्याने खुप वेळा अपघात झाले आहेत. राष्ट्रीय महामार्गावरील छोट्या मोठ्या झाडाच्या वाढलेल्या किंवा वाकलेल्या फांद्यामुळे अपघाताच्या धोक्याची घंटा समजून तात्काळ दुतर्फी रस्त्यांवरील फांद्या तोडून रस्ता चांगला करून द्या अशी मागणी होत आहे.



मुदखेडमधील वंचित शेतकऱ्यांना पाच हजारांची मदत तात्काळ द्या!

दुष्काळी अनुदानापासून अनेक शेतकरी वंचित; प्रलंबित रक्कम खात्यावर जमा करण्याची काँग्रेसची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

मुदखेड । अतिक अहेमद

मुदखेड तालुक्यासह शहरातील अनेक पात्र शेतकऱ्यांना शासनाने जाहीर केलेली अग्रिम पाच हजार रुपयांची दुष्काळी आर्थिक मदत अद्याप मिळालेली नसल्याने ही रक्कम तात्काळ त्यांच्या बँक खात्यावर जमा करण्यात यावी, अशी मागणी जिल्हा काँग्रेस कमिटी नांदेडचे महासचिव गिरीश भीमअप्पा कोत्तावार यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे. कमी पाऊस, पावसातील खंड, पिकांचे नुकसान आणि वाढता शेती खर्च यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. अशा परिस्थितीत शासनाकडून जाहीर झालेली मदतही अनेक पात्र शेतकऱ्यांपर्यंत पोहोचलेली नाही. बँक खाते, आधार लिंकिंग, ई-केवायसी तसेच तांत्रिक अडचणींमुळे अनेक शेतकऱ्यांची मदत प्रलंबित असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. यावेळी काँग्रेसच्या वतीने प्रशासनाकडे पुढील प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत. मुदखेड तालुक्यातील व शहरातील मदतीपासून वंचित असलेल्या सर्व पात्र शेतकऱ्यांच्या खात्यावर पाच हजार रुपयांची रक्कम तात्काळ जमा करावी, मदत न मिळालेल्या शेतकऱ्यांची गावनिहाय यादी तयार करून प्रलंबित प्रकरणांचा तातडीने निपटारा करावा, बँक खाते, आधार लिंकिंग, ई-केवायसी व तांत्रिक अडचणी दूर करण्यासाठी विशेष मोहीम राबवावी, पात्र शेतकऱ्यांना मदत न मिळण्याची कारणे तपासून संबंधित अधिकाऱ्यांकडून अहवाल मागवावा, शेतकऱ्यांना मदतीसाठी शासकीय कार्यालयांचे वारंवार हेलपाटे मारावे लागू नयेत, यासाठी प्रशासनाने विशेष लक्ष द्यावे. शासनाने जाहीर केलेली आर्थिक मदत प्रत्यक्ष पात्र शेतकऱ्यांपर्यंत पोहोचणे आवश्यक असून, वंचित शेतकऱ्यांना तातडीने न्याय द्यावा, अशी आग्रही मागणी काँग्रेसच्या वतीने करण्यात आली आहे. या निवेदनाची प्रत जिल्हा कृषी कार्यालय, नांदेड तसेच तहसीलदार, मुदखेड यांनाही देण्यात आली आहे. यावेळी काँग्रेस सेवादलाचे तालुकाध्यक्ष गंगाधर पाटील मगरे, बंडू शिवाजी खानसोळे, बळवंत पुयड, अनीस भाई, गौस मुल्ला फुलवाले, अवधूत खानसोळे आदी काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



बळीरामपूरातील जुगार अड्ड्यावर नांदेड ग्रामीण पोलिसांचा दणका!

नांदेड । प्रतिनिधी

जिल्ह्यात अवैध धंद्यांविरुद्ध पोलिसांनी सुरू केलेल्या विशेष मोहिमेत नांदेड ग्रामीण पोलिसांनी बळीरामपूर येथील अवैध जुगार अड्ड्यावर धडक कारवाई केली. वडर गल्लीच्या बाजूला बाभळीच्या झाडाखाली सुरू असलेल्या तिर्रट जुगारावर छापा टाकून पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. या कारवाईत तब्बल ३ लाख १६ हजार १०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

दि.१७ नोव्हेंबर २०२६ रोजी नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याचे पथक हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना बळीरामपूर येथील वडर गल्लीच्या बाजूला बाभळीच्या झाडाखाली काही जण बेकायदेशीररीत्या तिर्रट जुगार खेळत असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली. माहितीच्या आधारे पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत छापा टाकला. या कारवाईदरम्यान गंगाराम कडाजी वाघमारे (वय ५२, रा. शाहू चौक, बळीरामपूर), बालाजी भीमराव चव्हाण (वय ५०, रा. मधुबन शाळेजवळ, बळीरामपूर), सचिन उत्तम पवळे (वय २९, रा. जानापुरी, ता. लोहा), चिरंजीव संभाजी पाईकराव (वय ३३, रा. सिद्धार्थनगर, बळीरामपूर) आणि कृष्णा साईनाथ जाधव (वय २४, रा. वाडी, बळीरामपूर) हे पाच जण जुगार खेळताना आढळून आले.पोलिसांनी पंचांसमक्ष कारवाई करत घटनास्थळावरून ४ मोटारसायकली (अंदाजे २ लाख ८० हजार रुपये), ४ मोबाईल फोन (अंदाजे ३० हजार रुपये), ६ हजार १०० रुपये रोख आणि जुगाराचे साहित्य असा एकूण ३ लाख १६ हजार १०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक १४७६/२०२६ अन्वये महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम कलम १२ (अ) नुसार पाच आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



ही कारवाई पोलीस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन यांच्या आदेशाने, अपर पोलीस अधीक्षक संदीप जाधव तसेच पोलीस निरीक्षक अशोक जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. कारवाईत सहाय्यक पोलीस निरीक्षक पाटील, पोलीस उपनिरीक्षक चव्हाण व पोलीस अंमलदार खिल्लारे, सदावर्ते, समीर अहमद, आसिफ, टिप्परसे, कांबळे आणि माळगे यांनी सहभाग घेतला. नांदेड जिल्ह्यात अवैध जुगार, मटका आणि इतर बेकायदेशीर धंद्यांविरुद्ध पोलिसांकडून सातत्याने मोहीम राबविण्यात येत आहे. अशा अवैध हालचालींची माहिती नागरिकांनी पोलिसांना देऊन सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा पोलिसांकडून करण्यात आले आहे.

माजी मुख्यमंत्री व चार आमदारांना उडवण्याची धमकी देत व्यापाऱ्याकडे १ लाखांची खंडणी मागितली; आरोपी मुंबईतून जेरबंद

नांदेड स्थानिक गुन्हे शाखेची धडक कारवाई; खंडणीखोर आरोपीला मुंबईतून अटक

नांदेड । प्रतिनिधी

माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण आणि नांदेड जिल्ह्यातील चार आमदारांना उडवून देण्याचा कट रचल्याची धमकी देत एका व्यापाऱ्याकडे एक लाख रुपयांच्या खंडणीची मागणी करणाऱ्या आरोपीला नांदेडच्या स्थानिक गुन्हे शाखेने मुंबईतून अटक केली. रवी उर्फ रविंद्र गौतम रोकडे (वय ३९) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव असून, या कारवाईमुळे खंडणी प्रकरणाला गंभीर वळण मिळाले आहे.

फिर्यादी महेश कृष्णाजी तुतारे (वय ३३, व्यवसाय व्यापारी, रा. धनगर गल्ली, गुरुद्वारा गेट क्रमांक २, नांदेड) आणि आरोपी रवी रोकडे यांची पूर्वीपासून ओळख होती. आरोपी गेल्या काही दिवसांपासून फिर्यादीला फोन करून पैशांची मागणी करत होता. पैसे न दिल्यास धमक्याही देत होता. १४ नोव्हेंबर २०२६ रोजी दुपारी २.४२ वाजता फिर्यादी घरी असताना आरोपीने फोन करून एक लाख रुपयांची खंडणी मागितली. पैसे देण्यास नकार दिल्यानंतर आरोपीने माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण आणि नांदेड जिल्ह्यातील चार आमदारांना तीन वर्षांपूर्वी कारेगाव येथे एकाच दिवशी उडवून देण्याचा प्लॅन केल्याची धक्कादायक धमकी दिली. तसेच आपल्या पाठीशी मोठ्या लोकांचा हात असल्याचे सांगत पैसे न दिल्यास गंभीर परिणाम भोगावे लागतील, अशी धमकी दिली.

या प्रकरणी महेश तुतारे यांच्या तक्रारीवरून वजिराबाद पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ५५२/२०२६, भारतीय न्याय संहिता कलम ३०८(४) अन्वये खंडणीचा गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन यांच्या आदेशाने स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक महेश कोरे व त्यांच्या पथकाने आरोपीचा शोध सुरू केला. तांत्रिक तपास आणि गोपनीय माहितीच्या आधारे आरोपी मुंबईतील गावदेवी पोलीस ठाण्याच्या हद्दीत असल्याचे निष्पन्न झाले. मुंबई पोलिसांच्या मदतीने नांदेड एलसीबीच्या पथकाने पेडर रोड येथील भारतीय चित्रपट राष्ट्रीय संग्रहालय परिसरातून आरोपी रवी उर्फ रविंद्र गौतम रोकडे याला ताब्यात घेतले. आरोपी हा बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यातील आष्टा येथील रहिवासी असून, सध्या सिडको, नांदेड येथे वास्तव्यास असल्याची माहिती पोलिसांनी दिली. प्राथमिक चौकशीत त्याने गुन्ह्याची कबुली दिल्यानंतर पुढील कायदेशीर कारवाईसाठी त्याला वजिराबाद पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले.

माजी मुख्यमंत्री आणि आमदारांच्या नावाचा वापर करून धमकी देण्यामागील नेमका हेतू काय, आरोपीचे आणखी साथीदार आहेत का, तसेच इतर नेत्यांबाबत कोणता घातपाताचा कट होता का, याचा तपास पोलीस करीत आहेत. आरोपीला न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने एक दिवसाची पोलीस कोठडी सुनावली. या प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक सी.व्ही. बोयणे करीत आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन यांच्या आदेशाने, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल भोसले, पोलीस उपनिरीक्षक महेश कोरे तसेच पोलीस अंमलदार श्रीराम दासरे, संघरत्न गायकवाड, मनोज राठोड, सुधाकर देवकते आणि सायबर सेलचे राजेंद्र सिटीकर व दीपक ओढणे यांच्या पथकाने केली.

अर्धापूर तालुक्यातील नदी-नाल्यांत इसापूर धरणाचे पाणी सोडा

खा.अशोकराव चव्हाण यांच्याकडे ग्रामस्थांची निवेदनाद्वारे मागणी; अनेक गावांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटण्यास मदत होणार

अर्धापूर । संजय पंडित

अर्धापूर तालुक्यात यंदा भीषण दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली असून अनेक गावांमध्ये तीव्र पाणीटंचाई जाणवू लागली आहे. या पार्श्वभूमीवर तालुक्यातील नदी-नाल्यांमध्ये इसापूर धरणाचे पाणी सोडण्यात यावे, अशी मागणी माजी मुख्यमंत्री तथा राज्यसभा खासदार अशोकराव चव्हाण यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. अर्धापूर तालुक्यातील नदीपात्रावर अनेक गावांच्या ग्रामपंचायतींच्या पाणीपुरवठा योजनांच्या विहिरी अवलंबून आहेत. मात्र, सध्या नदी-नाल्यांमधील पाण्याची पातळी घटल्याने या विहिरींवर परिणाम होत असून नागरिकांना पिण्याच्या पाण्याच्या समस्येला सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे इसापूर धरणातून नदी-नाल्यांमध्ये पाणी सोडल्यास नदीपात्रातील जलसाठा वाढण्यास मदत होईल. परिणामी पाणीपुरवठा योजनांच्या विहिरींना पाणी उपलब्ध होऊन संबंधित गावांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लागू शकतो, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.



इसापूर धरणाचे पाणी सोडल्यास भोगाव, देळुब (खु.), देळुब (बु.), कोंढा, उमरी, सावरगाव, गणपूर, कामठा (बु.), सांगवी, खडकी, मेंढला (बु.), बामणी, शेलगाव आणि पिंपळगाव (महादेव) यांसह अनेक गावांना दिलासा मिळण्याची शक्यता आहे. दुष्काळी परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन अशोकराव चव्हाण यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना सूचना देऊन इसापूर धरणातून नदी-नाल्यांमध्ये पाणी सोडण्यासाठी तातडीने प्रयत्न करावेत, अशी विनंती ग्रामस्थांनी केली आहे.

उन्हाळ्यापूर्वीच पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर होण्याची शक्यता असल्याने प्रशासनानेही या मागणीकडे गांभीर्याने लक्ष देऊन आवश्यक कार्यवाही करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. या निवेदनावर माजी सरपंच राम कदम (कोंढा), हारदिपसिंघ कामठेकर (हाजू महाराज), विजय जाधव (सावरगाव), परमेश्वर बंडाळे (गणपूर), रामकृष्ण कदम (कोंढा), नारायण खरबे (तंटामुक्ती अध्यक्ष) यांच्यासह ग्रामस्थांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

भोकर येथील बँकांच्या बेकायदेशीर पार्किंगमुळे वाहतूक कोंडीचा विळखा; चोऱ्या आणि पाकीटमारीच्या घटनांमध्ये वाढ

भोकर । एजास कुरेशी

शहरातील मुख्य रस्त्यावर असलेल्या भारतीय स्टेट बँक आणि समोरच नव्याने सुरू झालेल्या एचडीएफसी बँकेकडे स्वतःची स्वतंत्र पार्किंग व्यवस्था नसल्याने ग्राहकांची सर्व वाहने थेट रस्त्यावर उभी केली जात आहेत. यामुळे अर्ध्याहून अधिक रस्ता व्यापला जात असून, शहरात मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी निर्माण झाली आहे. या गर्दीचा फायदा घेत परिसरात पाकीटमारी आणि वाहन चोरीच्या घटनांमध्येही लक्षणीय वाढ झाली असल्याने नागरिकांत तीव्र संताप व्यक्त होत आहे.

भोकरच्या न्यायालय (कोर्ट) समोर असलेल्या एसबीआय बँकेत दररोज शेकडो ग्राहक येतात. मात्र, बँकेकडे पार्किंगसाठी जागा नसल्याने दुचाकी आणि चारचाकी वाहने अस्ताव्यस्तपणे मुख्य रस्त्यावरच लावली जातात. यामुळे रस्ता निम्मा बंद होऊन वाहतूक पूर्णपणे विस्कळीत होत आहे. एसबीआय बँकेच्या अगदी समोरच एक भलीमोठी नवीन इमारत बांधण्यात आली असून, त्यामध्ये आता एचडीएफसी बँकेची शाखा सुरू झाली आहे. या नवीन इमारतीच्या बांधकामातही पार्किंगची कोणतीही सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली नाही. एकाच ठिकाणी दोन मोठ्या बँका समोरासमोर आल्याने आणि दोन्हीकडे पार्किंग नसल्याने या परिसरातील वाहतुकीचा प्रश्न अधिकच गंभीर झाला आहे.



बँकांसमोरील या प्रचंड गर्दीचा आणि अस्ताव्यस्त उभ्या असलेल्या वाहनांचा फायदा चोरटे घेत आहेत. पैसे काढण्यासाठी किंवा भरण्यासाठी आलेल्या ग्राहकांचे खिसे कापणे (पाकीटमारी), तसेच रस्त्यावर लावलेल्या दुचाकी चोरीला जाण्याच्या घटना वाढल्या आहेत. ज्येष्ठ नागरिक आणि महिलांना या गर्दीतून वाट काढताना मोठी कसरत करावी लागत आहे.

बांधकाम परवानगी देताना नगरपरिषद प्रशासनाने पार्किंगच्या नियमांकडे दुर्लक्ष केले का, असा सवाल आता उपस्थित केला जात आहे. वाहतूक कोंडी आणि गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी नगरपरिषद प्रशासन आणि वाहतूक पोलिसांनी या दोन्ही बँकांना तात्काळ पार्किंगची पर्यायी व्यवस्था करण्याचे आदेश द्यावेत, तसेच रस्त्यावर अस्ताव्यस्त वाहने लावणाऱ्यांवर कडक कारवाई करावी, अशी मागणी भोकरमधील नागरिक आणि व्यापाऱ्यांकडून होत आहे.

बँक प्रशासनाची बाजू

जागामालकाला पार्किंग आणि वॉल कंपाऊंडबाबत सूचना दिल्या आहेत. या गंभीर समस्येसंदर्भात भारतीय स्टेट बँकेचे शाखा व्यवस्थापक अनुज शेलारे यांची प्रत्यक्ष भेट घेऊन विचारणा केली असता, त्यांनी बँक प्रशासनाची बाजू स्पष्ट केली. ते म्हणाले की, ग्राहकांना आणि नागरिकांना होणाऱ्या वाहतुकीच्या त्रासाची आम्हाला कल्पना आहे. यासंदर्भात आम्ही संबंधित जागामालकाला पार्किंगची योग्य व्यवस्था उपलब्ध करून देण्याबाबत तसेच परिसरात वॉल कंपाऊंड बांधण्याबाबत स्पष्टपणे सांगितले आहे.

– अनुज शेलारे (शाखा व्यवस्थापक, एसबीआय, भोकर)

सोनखेड-पांढरी रस्ता मजबुतीकरण करण्याची नागरिकांची मागणी; पावसाळ्यात करावे लागते तारेवरची कसरत

नांदेड । प्रतिनिधी

पुर्णा तालुक्यातील चुडावा पासुन जवळच असलेल्या मौजे सोनखेड पांढरी रस्त्यावर डांबर टाकुन मजबूती करावी अशी मागणी येथील नागरिकांनी प्रतिनिधीशी बोलताना केली. पुर्णा तालुक्यातील मौजे सोनखेड पांढरी येथील लोकसंख्या जवळपास दहा हजारांच्या आसपास असुन येथील नागरिकांना कामा निमित्त पुर्णा व चुडावा येथे कामासाठी ये - जा करावे लागते. या रस्त्यावर नेहमी मोटारसायकल चालविणे म्हणजे तारेवरची कसरत करावी लागत आहे. पावसाळ्यात या रस्त्यावर चालणे मुश्कील असते. या भागातील लोकप्रतिनिधी निवडणुकीत या मतदार संघातील विकास कामे करू सोनखेड पांढरी ला येणारा रस्ता मजबुतीकरण करण्यासाठीं आम्ही सक्षम आहे. मोठ मोठे आश्वासन देऊन मते मिळवून घेतात. पण अनेक वर्षे झाली हा रस्ता काही मजबूत व दर्जेदार झाला नसल्याने नागरिकांना या रस्त्यावरून चालताना मोठा संघर्ष करावा लागतो आहे. अचानक घटना घडल्यास तात्काळ दवाखान्यात आडमिट करण्याची वेळ निर्माण झाली, तर काय? परिस्थिती असेल? येथील मुलांना माध्यमिक शिक्षण घेण्यासाठी शाळेत जाण्यासाठी पायी प्रवास करून जावे लागते आहे. जणं येण यामध्ये विद्यार्थ्यांना संघर्षात शिक्षण घ्यावे लागत आहे. जर हा रस्ता डांबरीकरण व मजबुत केल्यास या भागातील विद्यार्थी व नागरिकांचा वेळ वाया जाणार नाही. या रस्त्यावर चालताना तारेवरची कसरत थांबणार आहे. अनेकांनी या रस्त्यामुळे घर सोडून शहरात राहून काम धंदा करीत आहेत. तरी लोकप्रतिनिधी यांनी सोनखेड पांढरी रस्ता मजबुतीकरण करून द्या अशी मागणी पुढे येत आहे.



त्रिपुरारी पौर्णिमेनिमित्त २४ नोव्हेंबरला नांदेड शहरात भव्य लक्षदीपोत्सव

नांदेड । प्रतिनिधी



प्रकाश, श्रद्धा आणि भक्तीचा त्रिवेणी संगम असलेला त्रिपुरारी (कार्तिकी) पौर्णिमेचा पवित्र उत्सव यंदा २४ नोव्हेंबर रोजी साजरा होत आहे. या मंगलपर्वाचे औचित्य साधून अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाच्या वतीने यंदाही राज्यभर भव्य लक्षदीपोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमाचे हे १९ वे वर्ष असून, नांदेड जिल्ह्यातील भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन दीपोत्सवाची परंपरा अधिक व्यापक करावी, असे आवाहन अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाच्या वतीने प्रदेशाध्यक्ष निखिल भाऊ लातूरकर यांनी केले आहे.

दरवर्षीप्रमाणे यंदाही हा दीपोत्सव उत्साहात साजरा केला जाणार आहे. मंगळवार, २४ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ठीक ६ वाजता प्रत्येकाने आपल्या जवळच्या मंदिरात मंदिर विश्वस्तांची पूर्वपरवानगी घेऊन दीपप्रज्वलन करावे. या माध्यमातून सामूहिक श्रद्धा, धार्मिक एकात्मता आणि सांस्कृतिक परंपरेचे दर्शन घडविण्याचा महासंघाचा प्रयत्न आहे. यावर्षी एक लाख दीप प्रज्वलित करण्याचा मानस असल्याचे निखिलभाऊ लातूरकर यांनी यावेळी सांगितले. हिंदू धर्मपरंपरेत कार्तिकी पौर्णिमेला विशेष महत्त्व आहे. पौराणिक मान्यतेनुसार, भगवान शिवाने त्रिपुरासुर या राक्षसाचा वध करून देवतांना त्याच्या अत्याचारातून मुक्त केले. या विजयाच्या स्मरणार्थ हा दिवस 'त्रिपुरारी पौर्णिमा' म्हणून ओळखला जातो. या दिवशी मंदिरांमध्ये दीपप्रज्वलन, दीपदान आणि विशेष पूजाअर्चा केली जाते. अंधारावर प्रकाशाचा, असत्यावर सत्याचा आणि अधर्मावर धर्माचा विजय हा या उत्सवाचा संदेश आहे.

केवळ मंदिरांनाच नव्हे, तर प्रत्येकाच्या मनालाही भक्तीच्या प्रकाशाने उजळविणारा हा दीपोत्सव ठरावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. नांदेडमधील सर्व समाजबांधवांनी या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदवून लक्षदीपोत्सव यशस्वी करावा असे आवाहन प्रदेशाध्यक्ष निखिलभाऊ लातूरकर, राष्ट्रीय उपाध्यक्षा प्रीती वडवळकर, नांदेड जिल्हाध्यक्षा भाग्यश्री कुलकर्णी, जिल्हाप्रमुख अनंत राखे, महानगराध्यक्ष केदार नांदेडकर, बालासाहेब पांडे, सुनील रामदासी, राजेश कुलकर्णी, अपर्णा मोकाटे, सुवर्णा भोरे, यामिनी नांदेडकर यांनी केले आहे.

रस्त्यावरच खाजगी बस थांबे; नांदेडकरांचा जीव धोक्यात, वाहतूक कोंडीने नागरिक त्रस्त!

शहरातील मुख्य रस्त्यांवर बेशिस्त प्रवासी वाहतूक; अनधिकृत खाजगी बस चालविण्याचा आशीर्वाद जणूकाहीं नांदेड आरटीओचा

नांदेड । प्रतिनिधी

नांदेड शहरासह जिल्ह्यात अनेक ठिकाणी खाजगी बसच्या माध्यमातून अनधिकृतपणे प्रवासी वाहतूक सुरू असून, या बेशिस्त कारभारामुळे नागरिकांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे. शहरातील प्रमुख रस्त्यांवरच खाजगी बस थांबवून प्रवासी चढविणे व उतरविणे सुरू असल्याने वाहतुकीची कोंडी निर्माण होत असून, अपघातांचा धोकाही वाढला आहे.

रेल्वेस्थानक परिसर, हिंगोली गेट, बाफना देगलूर नाका, यासह शहरातील विविध प्रमुख ठिकाणी खाजगी बस (ट्रॅव्हल्स) रस्त्यावरच उभ्या केल्या जातात. त्यातून प्रवाशांची चढ-उतार प्रक्रिया सुरू असताना इतर वाहनांना मार्ग काढणे कठीण होते. अनेकदा मुख्य रस्त्याच्या मधोमध बस थांबवून प्रवासी घेतले जात असल्याने वाहतुकीचा खोळंबा होतो. शहराबरोबरच तालुक्याच्या ठिकाणीही अशाच प्रकारे खाजगी बस रस्त्यावर उभ्या केल्या जात असल्याचे चित्र आहे. या बेशिस्त प्रवासी वाहतुकीमुळे नागरिकांमध्ये संताप वाढत असून, वाहतूक कोंडीबरोबरच अपघातांची शक्यता कायम आहे. शहराजवळील वाजेगाव परिसरात नुकत्याच घडलेल्या बस अपघटनंतर खाजगी बस, (ट्रॅव्हल्स) वाहतुकीच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.



शहरातील मुख्य रस्त्यांवर सुरू असलेला हा खाजगी बसचा (ट्रॅव्हल्सचा) मनमानी कारभार थांबविण्यासाठी प्रशासनाने तातडीने कठोर पावले उचलावीत. शहरात खाजगी बसना अनधिकृत थांबे देण्यास बंदी घालावी, शहराबाहेर स्वतंत्र बस थांब्यांची व्यवस्था करावी किंवा नियमबाह्य प्रवासी वाहतुकीवर पूर्णपणे नियंत्रण आणावे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. जिल्हाधिकारी व संबंधित वाहतूक विभागाने या गंभीर समस्येची दखल घेऊन नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी तातडीने कारवाई करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

जगमित्र हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक, संपादक बालासाहेब जिजाराम कडबाने यांनी जगमित्र ऑफसेट, बाजीप्रभू नगर जवळ नेहरू चौक परळी वै. ता.परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक जगमित्र कार्यालय, ९-२-३४६, बिलाल नगर, देगलूर नाका, इतवारा, नांदेड महाराष्ट्र ४३१६०४ येथे प्रकाशित केले. (दैनिकातील मजकूर बातम्या बाबत संपादक सहमत असतीलच असे नाही.* पीआरबी कायद्यानुसार मजकूर निवडण्याची जबाबदारी यांचेवर राहील. Email:-jagmitra2010@gmail.com

PRGI.No.- MHMAR/26/A0270

Jagmitra, this newspaper, is printed, published, owned, and edited by Balasaheb Jijaram Kadbane at Jagmitra Offset, near Bajiprabhu Nagar, Nehru Chowk, Parli Vai., Taluka Parli Vai., District Beed (Maharashtra) and published from the Daily Jagmitra office, 9-2-346, Bilal Nagar, Deglur Naka, Itwara, Nanded, MAHARASHTRA - 431604. (The editor may not necessarily agree with the content and news in the daily newspaper. *According to the PRB Act, the responsibility for selecting the content rests with them.) Email:-jagmitra2010@gmail.com

PRGI.No.- MHMAR/26/A0270

19 Nov 2026_Layout 1 11/18/2026 10:45 PM Page 2

पालम तालुक्यात कृषी विभाग आणि दुकानदारांची मुजोरी चव्हाट्यावर

काबुली चना बियाण्यासाठी शेतकऱ्यांना वेठीस धरणाऱ्यांवर कारवाईची मागणी!

पालम/अनिस खुरेशी

रब्बी हंगाम तोंडावर असताना पालम तालुक्यातून एक अत्यंत संतापजनक प्रकार समोर आला आहे. शेतकऱ्यांना पेरणीसाठी अतिशय महत्त्वाचा असलेला काबुली चना (हरभरा) मिळेनासा झाला असून, शेतकरी दुकानांचे उंबरठे झिजवून बेजार झाले आहेत. पालम कृषी कार्यालयाने बियाणे वाटपासाठी दोन दुकाने नेमली असली, तरी प्रत्यक्षात मात्र तिथे बियाणे उपलब्ध नसल्याचे भासवले जात आहे. दुसरीकडे, कृषी कार्यालयातील काही अधिकारी आणि दोन्ही नेमणूक केलेले दुकानदार स्वतःच्या फायद्यासाठी आणि ओळखीच्या लोकांसाठी मनमानी कारभार चालवत असल्याचा खळबळजनक प्रकार उघडकीस आला आहे.

सविस्तर प्रकार व शेतकरी वर्गाचे गंभीर आरोप:

ओळखीच्यांना आणि रविवारी गोडाऊन उघडून वाटप: सामान्य शेतकरी बियाण्यासाठी चकरा मारत असताना, कृषी कार्यालयातील काही अधिकारी आपल्या ओळखीच्या लोकांना राजरोसपणे बियाणे वाटत आहेत. एवढेच नव्हे तर, चक्क रविवारी सुद्धा गोडाऊन उघडून मोजक्याच लागेबांधे असलेल्या लोकांना बियाण्यांची विल्हेवाट लावली जात असल्याचा संतापजनक प्रकार समोर आला आहे.

दुकानदारांची जबरदस्ती (लिंकिंगचा धंदा): कृषी कार्यालयाने बियाणे वाटपासाठी नेमलेले दोन्ही दुकानदार शेतकऱ्यांना सर्रास वेठीस धरत आहेत. ''आमच्या दुकानातून महागडी औषधं किंवा खतं घेतलीत, तरच काबुली चण्याचे बियाणे देऊ,'' अशी अरेरावीची आणि जबरदस्तीची भाषा हे दुकानदार वापरत असल्यामुळे शेतकरी आर्थिक पिळवणुकीला बळी पडत आहेत.

कार्यालय शेतकऱ्यांचे की दलालांचे?: ''हे कृषी कार्यालय नेमके बळीराजाच्या सेवेसाठी आहे की इथल्या काही भ्रष्ट अधिकारी (पान २ वर)

धाराशिव आरटीओ कार्यालयात दलाल आणि अधिकाऱ्यांच्या संगनमताने नागरिकांची आर्थिक पिळवणूक

कारवाई न झाल्यास आरपीआय डेमोक्रॅटिक करणार आंदोलन

धाराशिव/प्रतिनिधी

येथील उपप्रादेशिक परिवहन कार्यालयात (आरटीओ) अधिकारी व दलाल यांच्या संगनमताने नागरिकांची आर्थिक लूट सुरू असल्याचा गंभीर आरोप रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या (डेमोक्रॅटिक) वतीने करण्यात आला आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषी अधिकाऱ्यांना सक्तीच्या रजेवर पाठवावे व दलालांवर गुन्हे दाखल करावेत, अन्यथा येत्या १५ दिवसांत आरटीओ कार्यालयासमोर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा पक्षाच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

धाराशिव जिल्हाधिकारी कार्यालयात रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे (डेमोक्रॅटिक) जिल्हाध्यक्ष राज धज यांच्या नेतृत्वाखाली हे निवेदन बुधवार १८ नोव्हेंबर रोजी देण्यात आले.दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, धाराशिव जिल्हा दुष्काळग्रस्त असून नागरिकांच्या हाताला कामधंदा नाही.



अशा परिस्थितीत आरटीओ कार्यालयातील अधिकारी महेश रायबान आणि खेमनार यांनी गोपाळ चव्हाण व परमेश्वर जमदाडे या दलालांशी हातमिळवणी केली आहे. शासनाने निश्चित केलेल्या शुल्काव्यतिरिक्त नागरिकांकडून २,७०० रुपये अतिरिक्त आकारले जात आहेत.

विशेष म्हणजे, हे अतिरिक्त पैसे दलाल गोपाळ चव्हाण आणि परमेश्वर जमदाडे यांच्या फोन पे खात्यावर जमा केले जात आहेत.प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह

या गैरप्रकाराबाबत ४ नोव्हेंबर २०२६ रोजी उपप्रादेशिक परिवहन अधिकारी हर्षद डाके यांच्याकडे तक्रार करण्यात आली होती.

मात्र, ''हे दलाल बाहेरचे असून आमच्या कार्यकक्षेत येत नाहीत,'' असे उत्तर देऊन डाके यांनी जबाबदारी झटकल्याचा आरोप निवेदनात केला आहे. ''जर हे दलाल बाहेरील असतील, तर ते सकाळी १० ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत कार्यालयात काय करतात आणि त्यांचा अधिकाऱ्यांशी काय संबंध आहे?'' याची चौकशी करावी.


येत्या १५ दिवसांत या प्रकरणाची चौकशी करून दलालांवर गुन्हे नोंदवले नाहीत आणि (पान २ वर)

निष्ठावंत काँग्रेस कार्याची दखल; वसंतराव मुंडे यांची किसान काँग्रेसच्या वरिष्ठ उपाध्यक्षपदी नियुक्ती

परळी वैजनाथ/प्रतिनिधी

काँग्रेस पक्षाच्या विचारधारेशी गेल्या चार दशकांपासून एकनिष्ठ राहून पक्षसंघटनेसाठी सातत्याने कार्य करणारे ज्येष्ठ काँग्रेस कार्यकर्ते वसंतराव मुंडे यांची महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या किसान काँग्रेसच्या वरिष्ठ उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या प्रदीर्घ राजकीय प्रवासाची, पक्षनिष्ठेची आणि संघटनात्मक कार्याची दखल घेत त्यांच्यावर ही महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपविण्यात आली आहे. या नियुक्तीमुळे परळी वैजनाथसह बीड जिल्ह्यातील काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

काँग्रेस पक्षाचा एक निष्ठावंत कार्यकर्ता म्हणून वसंतराव मुंडे यांनी पक्षाची विचारधारा आणि संघटनात्मक बांधिलकी जपत आपला राजकीय प्रवास सुरू ठेवला आहे. पक्षाच्या कठीण काळातही निष्ठा कायम ठेवत सामान्य नागरिक, शेतकरी आणि ग्रामीण भागातील प्रश्नांशी जोडून राहण्याची त्यांची भूमिका राहिली आहे. त्यांच्या या प्रदीर्घ कार्याची वरिष्ठ नेतृत्वाने दखल घेतली आहे.



वरिष्ठ नेतृत्वाच्या विश्वासातून महत्त्वपूर्ण जबाबदारी

काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा माजी प्रदेशाध्यक्षपद श्री. नाना पटोले , माजी मुख्यमंत्री श्री पृथ्वीराज बाबा चव्हाण महसूलमंत्री श्री. बाळासाहेब थोरात आणि महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष श्री. हर्षवर्धन सपकाळ काँग्रेसचे गटनेते आ विजय वड्डेटीवार किसान काँग्रेसचे अध्यक्ष श्री पराग पास्ते यांनी वसंतराव मुंडे वर वरिष्ठ नेत्यांनी दाखविलेला विश्वास आणि सोपविलेली जबाबदारी ही आपल्या एकनिष्ठ पक्षकार्याची पावती असल्याची भावना मुंडे यांनी व्यक्त केली.

या नियुक्तीबद्दल त्यांनी काँग्रेस पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्वाचे मनःपूर्वक आभार मानले. तसेच, पक्षाने दिलेली जबाबदारी पूर्ण निष्ठेने आणि प्रामाणिकपणे पार पाडण्याचा निर्धार व्यक्त केला.

शेतकऱ्यांचे प्रश्न केंद्रस्थानी ठेवून काम करणार

महाराष्ट्रातील शेतकरी आज अनेक नैसर्गिक, आर्थिक आणि प्रशासकीय समस्यांना सामोरे जात आहेत. विशेषतः मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थिती, अनियमित पाऊस, पिकांचे नुकसान, पीकविमा कंपन्यांकडून नुकसानभरपाई मिळण्यातील अडचणी, जनावरांसाठी चारा आणि पाण्याची टंचाई अशा प्रश्नांनी शेतकरी त्रस्त आहेत.

पीकविमा आणि नुकसानभरपाईचा प्रश्न, दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांना मदत, जनावरांसाठी चारा छावण्या व पाणी उपलब्धता, शेतमालाला योग्य (पान २ वर)

ग्लोबल विकास ट्रस्टच्या सहकार्यामुळे बीडच्या केळीची विदेशात निर्यात!

३६ शेतकऱ्यांची आधुनिक शेतीतून यशस्वी भरारी!

परळी वैजनाथ/प्रतिनिधी



दुष्काळ, पाण्याची कमतरता आणि आर्थिक अडचणींवर मात करत आधुनिक शेतीच्या माध्यमातून समृद्धीचा मार्ग खुला होऊ शकतो, याचे प्रेरणादायी उदाहरण अंबाजोगाई तालुक्यातील मांडवा पठाण गावाने घालून दिले आहे. पारंपरिक कापूस आणि सोयाबीन शेती करणाऱ्या येथील ३६ शेतकऱ्यांनी ग्लोबल विकास ट्रस्टच्या सहकार्याने केळी लागवडीचा नवा प्रयोग केला. आज त्यांच्या शेतातील केळी विदेशात निर्यात होत असून, शेतकऱ्यांना लाखोंचे उत्पन्न मिळू लागले आहे.

यंदाच्या अत्यल्प पर्जन्यमानामुळे मराठवाड्यातील शेतकरी भीषण दुष्काळाचा सामना करत असताना मांडवा पठाणच्या शेतकऱ्यांनी निराशेला बळी न पडता शेतीत परिवर्तनाचा मार्ग स्वीकारला. जलनायक मयंक गांधी यांच्या मार्गदर्शनाखाली ग्लोबल विकास ट्रस्टने गावात नदी पुनरुज्जीवन, जीआरए शाफ्ट उभारणी आणि फळबाग लागवडीच्या माध्यमातून विकासाची पायाभरणी केली. शेतकऱ्यांना आधुनिक (पान २ वर)

२० नोव्हेंबर रोजी पाडळसिंगी टोलनाक्यावर चक्काजाम आंदोलनात शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे!

श्री गायके राजू यांचे बीड जिल्ह्यातील गावागावात जाऊन शेतकऱ्यांना कळकळीचे आवाहन



बीड/प्रतिनिधी

शेतकऱ्यांच्या हक्कासाठी... शेतकऱ्यांच्या न्यायासाठी...! ऊस, कापूस, सोयाबीन उत्पादक तसेच पशुधन जगवणाऱ्या शेतकऱ्यांच्या न्याय्य मागण्यांसाठी गुरुवार, दिनांक २० नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता राष्ट्रीय महामार्गावरील पाडळसिंगी टोलनाका, जिल्हा बीड येथे भव्य बेमुदत रास्तारोको व चक्काजाम आंदोलन करण्यात येणार आहे. या ऐतिहासिक आंदोलनात बीड जिल्ह्यातील तमाम शेतकरी बांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे जाहीर आवाहन स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे बीड जिल्हाध्यक्ष श्री गायके राजू यांनी केले आहे. या आंदोलनाला स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष तथा शेतकऱ्यांचा बुलंद आवाज मा. खासदार राजू शेट्टी साहेब यांच्यासह महाराष्ट्रातील स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे दिग्गज नेते व पदाधिकारी (पान २ वर)

संत मन्मथ स्वामींचे विचार जीवनाला दिशा देणारे : श्री गुरु सिद्धचैतन्य शिवाचार्य महाराज



परळी वैजनाथ/प्रतिनिधी

'गुरुराज माऊली... गुरुराज माऊली...'च्या जयघोषाने अवघी परळी नगरी दुमदुमली! ढोल-ताशांचा गजर, फटाक्यांची आतषबाजी आणि फुलांची उधळण अशा भक्तिमय वातावरणात श्रीक्षेत्र परळी वैजनाथ ते श्रीक्षेत्र कपिलधार संत श्री मन्मथ स्वामी पायी दिंडी सोहळ्याचे बुधवार, दि. १८ नोव्हेंबर रोजी उत्साहात प्रस्थान झाले. श्री गुरु वेदांताचार्य, शिवाचार्यरत्न पुरस्कारप्राप्त ष.ब्र. १०८ श्री गुरु सिद्धलिंग शिवाचार्य महाराज साखरखेर्डेकर यांच्या (पान २ वर)

कार्तिक पौर्णिमेनिमित्त परळीतील दिंडी मार्गावरील अतिक्रमणे हटवा

नगरसेवक नितीन बागवाले यांची मागणी

परळी वैजनाथ/प्रतिनिधी

देशातील बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या प्रभू श्री वैद्यनाथ ज्योतिर्लिंगाच्या दर्शनासाठी सध्या परळी शहरात भाविकांची मोठी गर्दी होत आहे. त्यातच कार्तिक पौर्णिमेनिमित्त नांदेड, परभणी, औंढा नागनाथ, बिचकुंदा यांसह विविध भागांतून वीरशैव लिंगायत समाजाच्या पायी दिंड्या परळी मार्गे कपिलधारकडे रवाना होत असतात. या पार्श्वभूमीवर भाविकांची गैरसोय टाळण्यासाठी आवश्यक सुविधा तातडीने उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे नगरसेवक नितीन बागवाले यांनी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.



मुख्याधिकारी परळी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, शहरातील छत्रपती (पान २ वर)

रामप्रसाद देवकर यांची वीर वडार एकता फाउंडेशनच्या हिंगोली जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती

हिंगोली/गोपाल सातपुते

हिंगोली । वीर वडार एकता फाउंडेशनच्या वतीने मुंबई येथे आयोजित राज्यस्तरीय कार्यक्रमात हिंगोली जिल्ह्यातील वडार समाजाचे संघटन मजबूत करण्यासाठी तसेच समाजाच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्यासाठी मा. श्री. रामप्रसाद मसाराव देवकर यांची हिंगोली जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. ते महिला आधार केंद्र, महाराष्ट्र राज्याचे प्रदेशाध्यक्ष म्हणूनही कार्यरत आहेत.

या नियुक्तीमुळे हिंगोली जिल्ह्यातील वडार समाज बांधवांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, त्यांच्या निवडीचे सर्व स्तरांतून स्वागत व अभिनंदन करण्यात येत आहे. वडार समाजाला संघटनात्मकदृष्ट्या सक्षम करणे, समाजातील युवकांना योग्य दिशा देणे, शिक्षण, रोजगार, सामाजिक एकता आणि समाजाच्या विविध प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणे, अशी महत्त्वपूर्ण जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली आहे. रामप्रसाद देवकर यांच्या नेतृत्वाखाली हिंगोली जिल्ह्यात वडार समाजाचे संघटन अधिक मजबूत होईल आणि समाजाच्या विकासासाठी विविध उपक्रम राबविले जातील, असा विश्वास समाजबांधवांनी व्यक्त केला आहे.



या नियुक्तीबद्दल समस्त वडार समाज बांधव, हिंगोली जिल्ह्याच्या वतीने रामप्रसाद देवकर यांचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात येत असून, त्यांच्या पुढील सामाजिक व संघटनात्मक वाटचालीस हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या आहेत. त्यावेळी उपस्थित वीर व वडार ऐकता फाउंडेशन चे संस्थापक अध्यक्ष विजयदादा गोरे यांच्या हस्ते देण्यात आले त्यावेळी संघटनेचे कार्याध्यक्ष (पान २ वर)

गणेश आघाव यांचे निधन

परळी वैजनाथ/प्रतिनिधी



परळी तालुक्यातील टोकवाडी येथील तरुण आणि कष्टाळू व्यावसायिक गणेश मुंजाजी आघाव (गडम अण्णा) वय-२८ वर्षे यांचे उपचारादरम्यान लातूर येथील गॅलेक्सी हॉस्पिटलमध्ये निधन झाले आहे. त्यांच्या निधनाने टोकवाडीसह पंचक्रोशीत हळहळ व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, गणेश आघाव यांना अचानक तीव्र स्वरूपाचा ब्रेन स्ट्रोक (Acute Brain Stroke) आल्यामुळे प्रकृती चिंताजनक झाली होती. त्यांना तातडीने उपचारासाठी लातूर येथील गॅलेक्सी हॉस्पिटल अँड क्रिटिकल केअर सेंटरमधील अतिदक्षता विभागात (ICU) व्हेंटिलेटरवर दाखल करण्यात आले होते. मात्र, उपचारादरम्यान त्यांची प्रकृती सुधारली नाही आणि त्यांची झुंज अपयशी ठरली. गणेश आघाव हे अत्यंत मनमिळाऊ, धाडसी व कष्टाळू तरुण होते. 'पवन हॉटेल'च्या माध्यमातून त्यांनी (पान २ वर)

अखिल महाराष्ट्र स्वकुळ साळी समाज संस्थेचे पाचवे प्रांतिक महाअधिवेशन कोल्हापुरात

अधिवेशनाच्या नियोजनासाठी स्वागत समितीच्या पदाधिकाऱ्यांची धारूर येथे समाजबांधवांशी भेट



धारूर/अतूल शिनगारे

अखिल महाराष्ट्र स्वकुळ साळी समाज संस्थेचे पाचवे प्रांतिक महाअधिवेशन शनिवार, दि. २६ डिसेंबर ते रविवार, दि. २७ डिसेंबर २०२६ या कालावधीत कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आले आहे. कोल्हापूर जिल्हा स्वकुळ साळी समाजांतर्गत स्वकुळ साळी समाज, कोल्हापूर शहर यांच्या वतीने या अधिवेशनाचे आयोजन करण्यात येत आहे.

या अधिवेशनाच्या नियोजनाच्या अनुषंगाने स्वागत समितीचे अध्यक्ष तथा उद्योजक उदय तुकाराम दुधाने, दिलीप अरुण पोरे, प्रशांत राजाराम पांढरपट्टे, अनिल शंकरराव भंडारे, गणेश महाजन आणि धोंडीराम गणपतराव पागडे यांनी सोमवारी, दि. १६ नोव्हेंबर (पान २ वर)

स्व.बाळासाहेब ठाकरे यांच्यामुळेच ताठ मानेने जीवन जगत आहोत-प्रा.अतुल दुबे

परळीत हिंदुहृदयसम्राट स्व.बाळासाहेब ठाकरे यांना स्मृती दिनी अभिवादन

परळी वैजनाथ/प्रतिनिधी

विश्व हिंदूहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख स्व.बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृति दिना निमित्त स्व.बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमा पूजन करून अभिवादन करण्यात आले.

१७ नोव्हेंबर हा दिन विश्वहिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांचा स्मृतिदिन असुन हा स्मृतिदिन सर्वत्र स्मृतीदिन साजरा करण्यात येत असतो याच अनुषंगाने शिवसेना प्रणित युवासेनेचे बीड जिल्हा समन्वयक प्रा.अतुल दुबे यांच्या हस्ते स्व.बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेस चाफ्याच्या फुलाचा हार अर्पण करत पूजन करून अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी बोलताना प्रा अतुल दुबे सर म्हणाले की



अनेक वर्षापासून आम्ही एकनिष्ठ पणे कुणाच्याही दबावाला बळी न पडता ताठ मानेने जीवन जगत आहोत ते फक्त हिंदुरुदयसम्राट शिवसेना सरसेनापती स्व.बाळासाहेब ठाकरे साहेबांमुळेच (पान २ वर)

माजलगाव बाजार समिती कार्यालयामध्ये अभिनेत्री प्रियंका उबाळे यांचा सत्कार संपन्न



माजलगाव/प्रतिनिधी

कृषी उत्पन्न बाजार समिती कार्यालयामध्ये १८ नोव्हेंबर रोजी मी रमाई या एकपात्री नाटकाच्या अभिनेत्री प्रियंका उबाळे यांनी भेट दिली असता त्यांचा सत्कार माजलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती श्रीहरी (नाना) मोरे यांच्या हस्ते करण्यात आला.

माजलगाव येथे दिनांक ०१ डिसेंबर रोजी सायंकाळी ०५ :०० वाजता व्यंकटेश मंगल कार्यालय गडी रोड येथे मी रमाई या नाटकाचा एकपात्री प्रयोग सादर होणार आहे या कार्यक्रमाचे आयोजन सार्वजनिक करण्यात आले आहे तरी सर्वांनी सहकुटुंब या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे बाजार समितीचे उपसभापती श्रीहरी नाना मोरे यांनी आपल्या मनोगतात व्यक्त केले

तसेच अभिनेत्री प्रियांका उबाळे यांनी (पान २ वर)

जलयुक्त शिवार च्या भक्कम कामामुळेच आज कन्हेरवाडीत नदी खोलीकरण सहज शक्य-मुंडे

परळी वैजनाथ/प्रतिनिधी



परळी तालुक्यातील कन्हेरवाडी येथे सध्या 'ग्लोबल विकास ट्रस्ट' (ऋतढ) आणि मयंक गांधी यांच्या माध्यमातून ब्रह्मा नदीच्या रुंदीकरण व खोलीकरणाचे काम वेगाने सुरू आहे. या उपक्रमाचे स्वागत करतानाच, आज हे काम इतक्या प्रभावीपणे आणि सहजतेने पूर्ण होण्यामागे २०१४ ते २०१९ या काळातील 'जलयुक्त शिवार' योजनेचा भक्कम पाया कारणीभूत असल्याचे मत भारतीय जनता पार्टी विद्यार्थी आघाडीचे तालुका अध्यक्ष ज्ञानेश्वर मुंडे यांनी व्यक्त केले आहे.

यासंदर्भात प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात ज्ञानेश्वर मुंडे यांनी म्हटले आहे की, 'सध्या ग्लोबल विकास ट्रस्टच्या माध्यमातून गावात सुरू असलेले जलसंधारणाचे काम अत्यंत स्तुत्य आहे. मात्र, या कामाचा खरा पाया २०१४ ते २०१९ या कालावधीत तत्कालीन जलसंधारण मंत्री लोकनेत्या (पान २ वर)

जगमित्र हे पत्र मुद्रक, प्रकाशन, मालक, संपादक बालासाहेब जिजाराम कडबाने यांनी जगमित्र ऑफसेट, बाजीप्रभू नगर जवळ नेहरू चौक परळी वै. ता.परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक जगमित्र कार्यालय, 'जगमित्र' बाजीप्रभू नगर नेहरू चौक (तळ) परळी वैजनाथ ४३१५१५ जि.बीड तर दैनिक जगमित्र कार्यालय घर क्र.२०, खडगाव रोड, क्रांतीनगर, विश्वशांती बौध्द विहार जवळ लातूर घर क्र.२२/२० एसटी कॉलनी, बाशी नाका, धाराशिव तनिश ऑर्किड, फेज-२, आर-विंग, ११०५, आळंदी आरडी., चारोली फाटा, ता. हवेली, पुणे ९-२-३४६, बिलाल नगर, देलगूर नाका, इतवारा नांदेड प्लॉट क्र.६६/२ सीटीएस क्र.९०, मयुरी रेसी, महिंद्रा शोरूमच्या मागे, छ.संभाजीनगर रोड, जालना येथे प्रकाशित केले आहे. (दैनिकातील मजकूर बातम्या बाबत संपादक सहमत असतीलच असे नाही.पीआरबी कायद्यानुसार मजकूर निवडण्याची जबाबदारी यांचेवर राहील.) कार्यकारी संपादक : बिलाल शेख मो.नं.९४२२४०४७४०

'Jagamitra' is printed by Balasaheb Jijaram Kadbane (Printer, Publisher, Owner, and Editor) at Jagamitra Offset, near Nehru Chowk, Bajiprabhu Nagar, Parli Vaijnath (Dist. Beed, Maharashtra). It is published from the following locations: 'Jagamitra' Office, Bajiprabhu Nagar, Nehru Chowk (Ground Floor), Parli Vaijnath 431515, Dist. Beed; House No. 20, Khadgaon Road, Krantinagar, near Vishwashanti Buddha Vihar, Latur; House No. 22/20, ST Colony, Bashi Naka, Dharashiv; Tanish Orchid, Phase-2, R-Wing, 1105, Alandi Road, Charoli Phata, Tal. Haveli, Pune; 9-2-346, Bilal Nagar, Delgur Naka, Itwara, Nanded; and Plot No. 66/2, CTS No. 90, Mayuri Residency, behind Mahindra Showroom, Chh. Sambhajinagar Road, Jalna. (The Editor does not necessarily agree with the content or news published in the daily; the responsibility for content selection rests with the designated person as per the PRB Act.) Executive Editor: Bilal Shaikh (Mobile No. 9422404740).

महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगमित्र

बद्रीनारायण घुगे (पुणे जिल्हा प्रतिनिधी)
मो.9922476927 PRGI.No.- MHMAR/26/A4099

पुणे जिल्हा आवृत्ती — गुरुवार दि.१९ नोव्हेंबर २०२६ — पान नं. ५

श्रीक्षेत्र देहूगांव येथे २० ते २२ नोव्हेंबरदरम्यान ९ वी राष्ट्रीय सवाते स्पर्धा; देशभरातील खेळाडूंचा सहभाग

देहूगांव । प्रतिनिधी

अम्युचर सवाते असोसिएशन ऑफ महाराष्ट्र यांच्या वतीने ९ वी राष्ट्रीय सावते स्पर्धा २०२६ चे आयोजन करण्यात आले आहे. देहूनगरीत प्रथमच राष्ट्रीय स्तरावरील या स्पर्धेचे आयोजन करण्यात येत असून, शुक्रवार (दि.२०) ते रविवार (दि. २२ नोव्हेंबर २०२६) या कालावधीत ही स्पर्धा पार पडणार आहे. देहू येथील सरस्वती लॉन्स येथे या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. देशभरातील विविध राज्यांतील खेळाडूंना आपले क्रीडाकौशल्य दाखविण्यासाठी या स्पर्धेच्या माध्यमातून व्यासपीठ उपलब्ध होणार आहे.

या स्पर्धेच्या उद्घाटनासाठी आमदार सुनील शेळके, महाराष्ट्र विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, आमदार महेश लांडगे यांच्यासह पिंपरी चिंचवड चे महापौर रवीभाऊ लांडगे देहूच्या नगराध्यक्षा स्मिताताई चव्हाण उपनगराध्यक्ष योगेशभाऊ काळोखे तसेच सर्व सन्मानीय नगरसेवक व विविध मान्यवरांना निमंत्रित करण्यात आले आहे. क्रीडा क्षेत्रातील अनेक मान्यवरांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती लाभणार आहे.

सवाते या क्रीडा प्रकाराला प्रोत्साहन देणे, खेळाडूंना राष्ट्रीय स्तरावर संधी उपलब्ध करून देणे आणि या खेळाचा प्रसार करणे हा या स्पर्धेच्या आयोजनामागील प्रमुख उद्देश आहे. अम्युचर सावते असोसिएशन ऑफ महाराष्ट्रचे सचिव सुहास धाईजे व सर्व आयोजक समितीच्या वतीने स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. क्रीडाप्रेमी आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून खेळाडूंना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या स्थायी समिती सभेत विविध कल्याणकारी प्रस्तावांना मंजुरी

पायाभूत सुविधा, रस्ते, स्वच्छता, शिक्षण, महिला सक्षमीकरण आणि सांस्कृतिक उपक्रमांना प्राधान्य

पिंपरी । प्रतिनिधी

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्थायी समितीची साप्ताहिक सभा बुधवार, दि.१८ नोव्हेंबर २०२६ रोजी दुपारी २.३० वाजता महानगरपालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमधील दिवंगत महापौर मधुकरराव पवळे सभागृहात पार पडली.या सभेत शहराच्या सर्वांगीण विकासाशी संबंधित पायाभूत सुविधा, रस्ते विकास, स्वच्छता, आरोग्य, शिक्षण, महिला सक्षमीकरण, पर्यावरण आणि सांस्कृतिक उपक्रमांच्या विविध प्रस्तावांवर चर्चा करून विविध विषयांना स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांनी सभेत मान्यता दिली.

पायाभूत सुविधा व रस्ते विकासकामे

शहरातील विविध प्रभागांमधील रस्त्यांचे डांबरीकरण, दुरुस्ती, पावसाळी गटारांची साफसफाई, नालेसफाई, अंतर्गत रस्ते, पदपथ आणि स्थापत्यविषयक देखभाल-दुरुस्तीच्या कामांना मान्यता देण्यात आली. चऱ्होली, वडमुखवाडी, चोविसावाडी, मोशी, डुडुळगाव, दिघी-बोपखेल, भोसरी, बुर्डेवस्ती, पठारे मळा, जाधववाडी, कुदळवाडी, बोऱ्हाडेवाडी, विनायकनगर आदी परिसरांतील विकासकामांचा यात समावेश आहे. तसेच दिघी-आळंदी रस्त्यावरील ग्रेड सेपरेटर, सबवे व उड्डाणपूल, एम्पायर इस्टेट उड्डाणपूल आणि नाशिक फाटा ते वाकड रस्त्यावरील विविध स्ट्रक्चर्सच्या रेलिंग, पर्जन्यजल वाहिन्या व इतर स्थापत्यविषयक दुरुस्तीच्या कामांना मंजुरी देण्यात आली. रस्ते दुभाजकांची देखभाल व सुशोभीकरण करण्याच्या कामासही मान्यता देण्यात आली.

मोठ्या पायाभूत प्रकल्पांसाठी निधी उभारणी

पवना थेट जलवाहिनी, ड्रेनेज मास्टर प्लॅन टप्पा-१, डीएमए स्थापना व नॉन-रेव्हेन्यू वॉटर प्रकल्प, सांडपाणी पुनर्वापर प्रकल्प, एकात्मिक घनकचरा व्यवस्थापन टप्पा-२ आणि मोशी हॉस्पिटल प्रकल्पासाठी केंद्र शासनाच्या अर्बन चॅलेंज फंड व इतर वित्तीय स्रोतांद्वारे निधी उभारणी करण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली. यासाठी स्वतंत्र निधी उभारणी समिती स्थापन करण्याचा प्रस्ताव महापालिका सभेकडे शिफारस करण्यासही मंजुरी देण्यात आली.

स्वच्छता, आरोग्य व नागरी सुविधांना प्राधान्य

विविध प्रभागांतील नालेसफाई, गटारांची साफसफाई, अतिक्रमण निष्कासन, आरोग्यविषयक कामे आणि सार्वजनिक



शौचालयांच्या दुरुस्तीला मंजुरी देण्यात आली. यासाठी आवश्यक यंत्रसामग्री व मनुष्यबळ उपलब्ध करून घेण्यास मान्यता देण्यात आली. एमआयडीसी परिसरातील रस्त्यांची दैनंदिन साफसफाई तसेच नेहरूनगर येथील नवीन न्यायालय परिसरातील स्वच्छतेसाठी कर्मचारी पुरविण्याच्या कामांना मुदतवाढ देण्यात आली. यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयातील विविध विभागांसाठी कॉटरी मशीन खरेदी, रुग्णालयातील रंगरंगोटी आणि भोसरी रुग्णालयातील स्थापत्यविषयक दुरुस्तीच्या कामांनाही मंजुरी देण्यात आली.

महिला सक्षमीकरण व रोजगाराभिमुख कौशल्य प्रशिक्षण

महिला सक्षमीकरण व सबलीकरण योजनेंतर्गत शहरातील महिला व मुलींना वस्तीपातळीवर रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी ५७ विविध विषयांचे मोफत कौशल्य विकास प्रशिक्षण देण्यास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात आली. यामध्ये अकाउंट्स, फॅशन डिझायनिंग, डिजिटल मार्केटिंग, ब्युटी व वेलनेस, फूड प्रोसेसिंग, माहिती तंत्रज्ञान, डेटा नालिसिस, आर्टिफिशियल इंटेलिजन्स, सायबर सिक्युरिटी, केटरिंग तसेच पारंपरिक कला आणि सेवा क्षेत्रातील अभ्यासक्रमांचा समावेश आहे. तसेच झोपडपट्ट्यांमधील सेवाशुल्क बिलांचे वाटप आणि नागरिकांची माहिती मोबाईल पद्धरे अद्ययावत करण्याचे काम महिला बचतगटांमार्फत करण्यास मान्यता देण्यात आली. यामुळे महिला बचतगटांना रोजगाराची संधी उपलब्ध होणार आहे.

शिक्षण व विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रम

महानगरपालिकेच्या प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी स्कॉलरशिप, एनएमएमएस, नवोदय परीक्षा सराव पुस्तके तसेच उर्दू व हिंदी माध्यमाच्या स्वाध्याय पुस्तिका खरेदी करण्यास मान्यता देण्यात आली. प्राथमिक शिक्षण विभागांतर्गत इयत्ता पाचवी व नववीतील इच्छुक विद्यार्थ्यांना पालकांच्या संमतीने सूर्यनमस्कार आणि भगवद्गीता प्रशिक्षण देण्याच्या उपक्रमासही मंजुरी देण्यात आली. महापालिकेच्या १०५ शाळांमधील सुमारे ५० हजार विद्यार्थ्यांपैकी पहिल्या टप्प्यात एक हजार विद्यार्थ्यांची नोंदणी करण्याचे नियोजन आहे.

ग्रंथालये, सांस्कृतिक व सामाजिक उपक्रम

शाहूनगर, संभाजीनगर, आकुर्डी, संत तुकारामनगर आणि केशवनगर येथील सार्वजनिक ग्रंथालये ज्येष्ठ नागरिक संघ व महिला बचतगटांमार्फत चालविण्याच्या करारास ११ महिन्यांची मुदतवाढ देण्यात आली. महर्षी वाल्मिकी जयंतीनिमित्त पिंपरी व पिंपरीगाव येथे आयोजित महर्षी वाल्मिकी विचार प्रबोधन पर्व २०२६ तसेच महानगरपालिकेच्या ४४ व्या वर्धापन दिनानिमित्त येणा-या खर्चास मान्यता देण्यात आली. महानगरपालिका, थिएटर वर्कशॉप कंपनी आणि पेस कल्चरल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने २१ ते २४ नोव्हेंबर २०२६ दरम्यान ग. दि. माडगूळकर नाट्यगृह येथे आयोजित करण्यात येणाऱ्या 'रंगानुभूती : पूर्वरंग ते उत्तररंग' या प्रयोग कला महोत्सवासाठी अंदाजित २४ लाख ८५ हजार रुपयांच्या खर्चास मंजुरी देण्यात आली. निगडी येथील भक्ती शक्ती उद्यानातील भव्य राष्ट्रध्वज फडकविणे, त्याचे संचलन व देखभाल तसेच संबंधित यंत्रणेच्या दुरुस्तीच्या कामासही मान्यता देण्यात आली.

अन्य महत्त्वपूर्ण निर्णय

प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २.० च्या अंमलबजावणीसाठी सल्लागार एजन्सी नियुक्त करण्याच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात आली. चिखली येथील मंजूर विकास योजनेतील वाहनतळ, सांस्कृतिक केंद्र व वाचनालयासाठी आरक्षित जागा जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख क्र. २ पुणे (उत्तर) कार्यालयास ३० वर्षांच्या भाडेपट्ट्याने देण्याचा प्रस्ताव महापालिका सभेकडे शिफारस करण्यास मान्यता देण्यात आली. सेवानिवृत्त व मयत कर्मचाऱ्यांची सेवानिवृत्ती व वेतन पडताळणीची प्रकरणे तातडीने निकाली काढण्यासाठी लेखा विभागात दोन सेवानिवृत्त अधिकाऱ्यांची सहा महिन्यांसाठी मानधनावर नियुक्ती करण्यासही मान्यता देण्यात आली.

याशिवाय पवना थेट पाइपलाइन प्रकल्पाच्या लवाद प्रकरणात महापालिकेची बाजू मांडण्यासाठी नियुक्त वरिष्ठ विधिज्ञांच्या कामकाजास आणि क्रीडा प्रबोधिनी विद्यालयातील विद्यार्थ्यांच्या भोजन व अल्पोपहार पुरवठ्याच्या कामास मुदतवाढ देण्यास कार्योत्तर मान्यता देण्यात आली. शहरातील विकासकामांना गती देतानाच नागरिकांना मूलभूत सुविधा, महिलांना रोजगाराच्या संधी, विद्यार्थ्यांना शैक्षणिक उपक्रम आणि सामाजिक-सांस्कृतिक क्षेत्राला प्रोत्साहन देणाऱ्या विविध प्रस्तावांना स्थायी समितीने मंजुरी दिली.

आयुक्त डॉ.विजय सुर्यवंशी यांचा सत्कार

स्वच्छ सर्वेक्षण २०२५-२६ मध्ये महाराष्ट्रातील सर्वात स्वच्छ शहर म्हणून पिंपरी चिंचवड महापालिकेची निवड झाल्याबद्दल स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांचे हस्ते आयुक्त डॉ.विजयजी सुर्यवंशी साहेब यांचा स्थायी समिती सभेत सत्कार करण्यात आला यावेळी स्थायी समिती सदस्य तसेच अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम ,तृप्ती सांडभोर,विक्रांत बगाडे आणि उप आयुक्त डॉ.प्रदीप जंगम उपस्थित होते.

अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणांवरील कारवाईला गती देण्याचे अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांचे निर्देश

पिंपरी । प्रतिनिधी

आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या निर्देशानुसार अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्या अध्यक्षतेखाली पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भवनातील मधुकर पवळे सभागृह येथे अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणांवरील कारवाईचा आढावा घेण्यासाठी बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस बांधकाम परवानगी विभागाचे सहशहर अभियंता सुनील बागवानी, कार्यकारी अभियंता, उपअभियंता, सर्व क्षेत्रीय अधिकारी आणि बीट निरीक्षक उपस्थित होते. बैठकीत महापालिकेच्या मालकीच्या भूखंडांवरील अतिक्रमणांचा आढावा घेण्यात आला. या भूखंडांवरील अतिक्रमणे निष्कासित करण्यासाठी आवश्यक प्रस्ताव तयार करून पुढील आठवड्यात निष्कासनाची कारवाई करण्याच्या सूचना संबंधित क्षेत्रीय अधिकारी, नगररचना विभागाचे अधिकारी आणि बीट निरीक्षक यांना देण्यात आल्या.

क्षेत्रीय कार्यालयांच्या कार्यक्षेत्रातील सार्वजनिक पदपथांवरील अतिक्रमणे



हटविण्याची नियमित कारवाई सुरू ठेवावी, असे निर्देश क्षेत्रीय अधिकारी आणि बीट निरीक्षकांना देण्यात आले. तसेच रस्त्यांवर झालेली अतिक्रमणे आणि अनधिकृत बांधकामांच्या ठिकाणी सुरू असलेली प्राथमिक स्वरूपातील कामे, विशेषतः फुटिंगची कामे, यांची तातडीने पाहणी करून संबंधित ठिकाणांची यादी तयार करावी आणि नियमानुसार निष्कासनाची कारवाई प्रस्तावित करावी, अशा सूचनाही देण्यात आल्या. दिवाळीच्या सुट्टीच्या कालावधीत शहरात अनधिकृत बांधकामे झाल्याबाबत प्राप्त झालेल्या तक्रारींची क्षेत्रीय अधिकारी आणि बीट निरीक्षक यांनी प्रत्यक्ष पाहणी करून आवश्यक ती कारवाई प्रस्तावित करावी, असे निर्देश देण्यात आले.

शहरातील इमारतींच्या पार्किंगसाठी राखीव असलेल्या जागेचा व्यावसायिक कारणांसाठी होणाऱ्या अनधिकृत वापराबाबतही बैठकीत कारवाईचा आढावा घेण्यात आला. बांधकाम परवानगी विभागाचे कार्यकारी अभियंता आणि उपअभियंता यांनी क्षेत्रीय अधिकाऱ्यांशी समन्वय साधून या प्रकरणांमध्ये आवश्यक कारवाई या आठवड्यात पूर्ण करावी, असे निर्देश अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांनी दिले.

भटक्या श्वानांच्या समस्येवर तातडीने उपाययोजना करा; उपमहापौर शर्मिला बाबर यांचे अधिकाऱ्यांना निर्देश

पिंपरी । प्रतिनिधी

शहरातील भटक्या श्वानांमुळे नागरिकांना होणारा त्रास आणि सुरक्षेचा प्रश्न लक्षात घेता उपमहापौर शर्मिला बाबर यांनी गवळीमाथा रोड, पिंपरी येथील श्वान निवारा केंद्र आणि पशु इस्पितळाला भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी त्यांनी निवारा केंद्रातील व्यवस्था, श्वानांचे लसीकरण व नसबंदी, तसेच नागरिकांकडून प्राप्त होणाऱ्या तक्रारींच्या अनुषंगाने संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून सविस्तर माहिती घेतली. नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत भटक्या श्वानांच्या समस्येवर तातडीने आणि नियोजनबद्ध पद्धतीने उपाययोजना करण्याचे निर्देश त्यांनी अधिकाऱ्यांना दिले.

शहरातील विविध भागांतून भटक्या श्वानांच्या त्रासाबाबत नागरिकांच्या तक्रारी प्राप्त होत आहेत. विशेषतः लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि महिलांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने या समस्येकडे गांभीर्याने पाहण्याची आवश्यकता आहे. यापूर्वी घडलेल्या घटनांची पुनरावृत्ती होऊ नये, यासाठी संभाव्य समस्याग्रस्त भागांची ओळख करून प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यावर भर देण्याची गरज असल्याचे उपमहापौर बाबर यांनी यावेळी स्पष्ट केले.



लसीकरण, नसबंदी आणि आक्रमक श्वानांच्या व्यवस्थापनासाठी सूचना

पाहणीदरम्यान श्वानांची संख्या, लसीकरण व नसबंदीची सद्यस्थिती, श्वान पकडण्यासाठी उपलब्ध पथके, मनुष्यबळ आणि साधनसामग्री याबाबत त्यांनी माहिती घेतली. लसीकरण व नसबंदीच्या कामाला गती देऊन ते नियमितपणे सुरू ठेवावे, तसेच चावणाऱ्या किंवा आक्रमक श्वानांबाबत तक्रार प्राप्त झाल्यास २४ तासांच्या आत आवश्यक कार्यवाही करून त्यांना नियमानुसार सुरक्षितपणे वेगळे ठेवण्याची व्यवस्था करावी, अशा स्पष्ट सूचना त्यांनी दिल्या. वारंवार तक्रारी येणाऱ्या भागांत प्राधान्याने कार्यवाही करावी आणि आवश्यकतेनुसार पथकांची संख्या व साधनसामग्री वाढवावी, असेही त्यांनी सांगितले. यावेळी संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या कामकाजातील अडचणीही त्यांनी जाणून घेतल्या. या अडचणी दूर करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करून त्यावर तातडीने तोडगा काढण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

श्वान निवारा केंद्रातील व्यवस्थेची पाहणी

नागरिकांची सुरक्षितता महत्त्वाची असली तरी श्वान निवारा केंद्रात आणलेल्या श्वानांची योग्य काळजी घेणेही तितकेच आवश्यक आहे, श्वानांना वेळेवर अन्न व स्वच्छ पाणी, आवश्यक औषधोपचार आणि लसीकरण मिळत आहे का, तसेच केंद्रातील स्वच्छता आणि आरोग्यविषयक सुविधा योग्य आहेत का, याची देखील त्यांनी पाहणी केली. केंद्रातील व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी डॉक्टर, औषधे, पाणी, स्वच्छता किंवा अन्य आवश्यक सुविधांची कमतरता असल्यास ती निदर्शनास आणून द्यावी, जेणेकरून आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी कार्यवाही करता येईल, असेही त्यांनी सांगितले.

नागरिकांची सुरक्षितता आणि प्राण्यांची काळजी या दोन्ही गोष्टींना प्राधान्य

शहरातील नागरिकांना रस्त्यावरून निर्भयपणे वावरता आले पाहिजे. विशेषतः लहान मुले, महिला आणि ज्येष्ठ नागरिक यांच्या सुरक्षिततेबाबत कोणतीही हलगर्जीपणा होता कामा नये. त्याचवेळी मुक्या प्राण्यांशी माणुसकीने वागत त्यांच्या आरोग्याची आणि देखभालीची योग्य व्यवस्था करणेही आवश्यक आहे. त्यामुळे नागरिकांची सुरक्षा आणि श्वानांची काळजी या दोन्ही बाबींचा समतोल राखून प्रभावी कार्यवाही करावी, असे देखील उपमहापौर बाबर यांनी सांगितले. यावेळी उपमहापौर बाबर यांनी नागरिकांना आवाहन केले की, भटक्या श्वानांबाबत कोणत्याही प्रकारची तक्रार किंवा समस्या असल्यास नागरिकांनी ८७८८०७०६६५ या क्रमांकावर संपर्क साधून आपली तक्रार नोंदवावी. प्राप्त तक्रारींची दखल घेऊन संबंधित विभागामार्फत आवश्यक कार्यवाही करण्यात येईल. या पाहणीप्रसंगी मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अरुण दगडे यांच्यासह पशुवैद्यकीय विभागाचे अधिकारी, डॉक्टर्स आणि कर्मचारी उपस्थित होते.

पिंपरी न्यायालयातील ६७ कर्मचारी बेमुदत संपावर; न्यायालयीन कामकाज ठप्प

पिंपरी । प्रतिनिधी

वेतनवाढीचा प्रस्ताव रखडल्याने राज्यातील न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी मंगळवार (दि. १७) पासून बेमुदत संप पुकारला आहे. त्यानुसार नेहरूनगर, पिंपरी येथील दिवाणी व फौजदारी न्यायालयातील वर्ग तीन व वर्ग चारच्या ६७ कर्मचाऱ्यांनी वेतनवाढीच्या मागणीला पाठिंबा दर्शवत आंदोलनात सहभाग घेतला आहे. कर्मचाऱ्यांच्या काम बंद आंदोलनामुळे पिंपरी न्यायालयातील कामाकाजवर परिणाम झाला आहे.

संपामध्ये सहाय्यक अधीक्षक, स्टेनो, वरिष्ठ लिपिक, कनिष्ठ लिपिक आणि शिपाई या पदांवरील कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. गेल्या २१ महिन्यांपासून वेतनवाढीचा निर्णय प्रलंबित असल्याने कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी आहे. या मागणीसंदर्भात उच्च न्यायालयाच्या स्तरावरून जानेवारी २०२५ मध्ये शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात आला असल्याचे संपात सहभागी असलेल्या कर्मचाऱ्यांनी सांगितले.

आंदोलनाबाबत तीन महिन्यांपूर्वीच शासनाला पूर्वसूचना देण्यात आली होती. त्यानंतर दोन महिन्यांपूर्वी कर्मचाऱ्यांनी काळ्या फिती लावून शांततेच्या मार्गाने आंदोलन केले. मात्र, या आंदोलनानंतरही वेतनवाढीच्या प्रश्नावर कोणताही ठोस निर्णय झाला नाही. त्यामुळे अखेर कर्मचाऱ्यांनी उपोषणाचा मार्ग स्वीकारला आहे. कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढीचा प्रश्न मार्गी लावण्याबरोबरच त्यांच्या प्रलंबित मागण्यांवर शासनाने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली आहे. शासनाकडून लवकर निर्णय न झाल्यास आंदोलन पुढे सुरू ठेवण्याची भूमिका कर्मचाऱ्यांनी घेतली आहे.

दुष्काळग्रस्त पशुधनासाठी महापालिकेचा पुढाकार; ४०० एकरांवर चारा लागवड करणार

पिंपरी । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्यातील अनेक भागांत दुष्काळ निर्माण झाल्याने पाण्यासह जनावरांसाठी चाऱ्याची तीव्र टंचाई निर्माण झाली आहे. दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मदतीसाठी पिंपरी-चिंचवड महापालिका पिंपरी येथील मिलिटरी डेअरी फार्मच्या सुमारे चारशे एकर पडीक जागेत चारा लागवड करणार आहे. तो चारा दुष्काळग्रस्त भागांना पुरवण्यात येणार आहे.

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर शेतकरी व पशुधनासाठी मदतीचे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले आहे. त्या आवाहनाला प्रतिसाद देत महापालिकेने हा उपक्रम हाती घेतला आहे. शहरात पिंपरी येथे संरक्षण विभागाची मिलिटरी डेअरी फार्मची सुमारे ४०० एकर पडीक जमीन आहे. संरक्षण विभागाने तेथील डेअरी काही वर्षांपूर्वी बंद केली आहे. गेल्या वर्षी तेथे झालेल्या धार्मिक सत्संग कार्यक्रमासाठी तो भाग स्वच्छ करून सपाटीकरण करण्यात आले होते. त्या वेळी डेअरी फार्मची इतकी मोठी जागा शहराच्या मध्यभागात असल्याचे शहरवासीयांना समजले. ती जागा चारा लागवडीसाठी महापालिकेस तात्पुरत्या कालावधीसाठी देण्याची मागणी संरक्षण विभागाकडे करण्यात आली आहे. चारा लागवड पूर्ण झाल्यानंतर संरक्षण विभागास ती जमीन पूववर्त करून देण्यात येणार आहे.

संरक्षण विभागाकडून एनओसी मिळाल्यानंतर जमिनीची मशागत करून लागवडीचे काम सुरू करण्यात येणार आहे. या जमिनीत मका व इतर चारा पिकांची लागवड केली जाणार आहे. त्यासाठी महापालिका आपले मनुष्यबळ लावणार आहे. जानेवारी महिन्याच्या पहिल्या किंवा दुसऱ्या आठवड्यात पेरणी करण्याचे नियोजन असून, साधारण दोन ते तीन महिन्यांत म्हणजेच मार्च किंवा एप्रिलपर्यंत चारा उपलब्ध होण्याची अपेक्षा आहे. तयार होणारा चारा राज्यात सर्वाधिक टंचाई असलेल्या भागांत पाठविण्याचे नियोजन आहे. शासनाच्या मार्गदर्शनानुसार चारा उपलब्ध करून देण्यास मदत होणार आहे, असे महापालिका प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.

अलंकापुरीत छठ महापर्व २०२६ चे उत्साहात भव्य आयोजन

आळंदी । प्रतिनिधी

राष्ट्रीय उत्तर भारतीय संघ व जगद्गुरु स्वामी शंकराचार्य समिती आळंदी देवाची, पुणे यांच्या वतीने उत्तर भारतातील सर्वात मोठा सूर्यदेवतेचा उत्सव असलेल्या छठ महापर्व २०२६ चे भव्य आयोजन आळंदीत इंद्रायणी दुतर्फा नदीच्या तिरावर करण्यात आले.

आळंदीत नदी परिसरात तसेच परिसरातील रस्त्यावर मोठ्या संख्येने उत्तर भारतीय भाविक, नागरिकांनी सह कुटुंब गर्दी केली. इंद्रायणी नदीच्या दोन्ही तिरांवर मोठ्या प्रमाणावर हा उत्सव साजरा करण्यात आला. छठ महापर्व हा कार्तिक मासातील षष्ठी तिथीला साजरा केला जाणारा महापर्व आहे. या पूजेमध्ये सूर्यदेवाची ३ दिवस निर्जला उपवास ठेवून श्रद्धा आणि विश्वासाने उपासना केली जाते. सूर्यदेवाला संध्या अर्घ्य आणि दिले गेले. १६ तारखेला सकाळी प्रातः अर्घ्य देण्यात येणार आहे.

यामध्ये छठ व्रतींचे आगमन उत्साहात झाले. स्वागत, दीप प्रज्वलन, सांस्कृतिक कार्यक्रम, संध्या अर्घ्य, कार्तिकी अन्नदान, प्रातः अर्घ्य, महाप्रसाद वितरण उत्साहात झाले. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी कृपाशीर्वाद गुरूवर्य ह.भ.प. मारुती बाबा कुऱ्हेकर, गुरूवर्य ह.भ.प. नारायण महाराज जाधव मान्यवरांचे लाभले. या प्रसंगी आळंदी नगरपरिषदेचे नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे, बाबाराजे तापकीर पाटील, श्री आवेकर भावे रामचंद्र संस्थान ट्रस्टचे विश्वस्त अर्जुन मेदनकर, मराठा सेवक अरुण कुरे व सर्व आजी माजी नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष, नगरसेवक, नगरसेविका, सामाजिक, राजकीय व धार्मिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे संयोजन श्री शंकराचार्य समिती आणि सुधीरकुमार शर्मा, अन्नू भारद्वाज यांनी केले. यावेळी डॉ. अनु कृष्णा, मानवाधिकार आयोगाचे राष्ट्रीय अध्यक्ष व माजी न्यायाधीश शिवदास महाजन, महाराष्ट्र राज्य मानवाधिकार आयोगाच्या उपाध्यक्ष सीमा आनंद, डॉ. सुनिता पाटसकर, सुधीरकुमार शर्मा, राकेश महतो, श्यामलालजी, अरविंद सिंह, जितेंद्र सिंह, कृष्ण एस भारद्वाज, दारासिंह, धर्मेंद्र सिन्हा, राजेश यादव, उपेंद्र यादव, धर्मेंद्र सिंह आदी पदाधिकारी यांनी विशेष परिश्रम घेत छठ महापर्व २०२६ चे यशस्वी आयोजन केले.

पिंपरी-चिंचवडकरांना मार्चमध्ये मिळणार १६७ एमएलडी अतिरिक्त पाणी

पिंपरी । प्रतिनिधी

मागील सात वर्षांपासून एकदिवसाआड पाणीपुरवठा त्यात सध्या दहा टक्के पाणी कपातीला पिंपरी-चिंचवड शहरवासीयांना सामोरे जावे लागत आहे. नागरिकांना भामा आसखेड धरणातून नवीन वर्षात मार्च महिन्यात १६७ एमएलडी पाणी मिळणार आहे. या योजनेचे काम जानेवारी २०२७ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन महापालिका प्रशासनाने केले आहे. थेट धरणापासून भूमिगत जलवाहिनीद्वारे मिळणाऱ्या स्वच्छ अतिरिक्त पाण्यामुळे शहरातील पाणीपुरवठ्यावरील ताण कमी होऊन नागरिकांना दिलासा मिळण्याची शक्यता आहे.

शहराची लोकसंख्या झपाट्याने वाढत असून, त्यानुसार पाण्याची मागणीही वाढत आहे. मात्र, उपलब्ध पाणीसाठा आणि वाढती मागणी यांचा ताळमेळ घालताना महापालिका प्रशासनाला कसरत करावी लागत आहे. शहरातील अनेक भागांमध्ये नागरिकांना अपुऱ्या व अनियमित पाणीपुरवठ्याला सामोरे जावे लागत आहे. पाणी कपातीमुळे नागरिकांची गैरसोय होत असून, नियमित व पुरेशा दाबाने पाणी मिळावे, अशी नागरिकांची मागणी आहे.

या पार्श्वभूमीवर खेड तालुक्यातील भामा-आसखेड धरणातून अतिरिक्त मिळणाऱ्या पाण्याकडे शहरवासीयांचे लक्ष लागले आहेत. या योजनेतून १६७ एमएलडी पाणी बंदिस्त जलवाहिनीद्वारे चिखली येथील जलशुद्धीकरण केंद्रात आणण्यात येणार आहे. जुन्या ठेकेदाराकडून काम काढून घेऊन उर्वरित कामासाठी नव्याने ठेकेदार नेमण्यात आले आहेत. ते काम दोन टप्प्यात करण्यात असून, ते मुदतीमध्ये पूर्ण करण्यावर भर देण्यात आला आहे. ते अतिरिक्त पाणी शहराला उपलब्ध झाल्यास शहराच्या एकूण पाणीपुरवठ्यात वाढ होणार आहे. त्यामुळे सध्याच्या पाणीपुरवठा व्यवस्थेवरील ताण कमी करण्यास मदत होईल. तसेच, पाणी कपातीचे नियोजन बदलणे किंवा नागरिकांना अधिक नियमित पाणीपुरवठा करणे शक्य होईल, असा विश्वास पाणीपुरवठा विभागाने व्यक्त केला आहे. दहा टक्के पाणी कपातीनंतर शहराला सध्यस्थितीत पवना धरणातून ५२० एमएलडी, आंद्रा धरणातून ९० एमएलडी तर एमआयडीसीकडून २५ एमएलडी असा ६३५ एमएलडी पाणीपुरवठा केला जात आहे. परंतू, त्यानंतरही शहरातील विविध भागातून अपुरा व कमी दाबाने पाणी पुरवठा होत असल्याच्या तक्रारींमध्ये सातत्याने वाढ होत आहे.

मुळशी धरणातील पाणी देण्यास जलसंपदा विभागाचा नकार

शहराची वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन मुळशी धरणातून ७६० एमएलडी पाणी आरक्षित करण्याची विनंती महापालिकेने जलसंपदा विभागाकडे सन २०२३ मध्ये केली होती. या मागणीस नकार देत राज्य शासनाकडे पाठपुरावा करण्याबाबत जलसंपदा विभागाने महापालिकेला कळविले होते. त्या संदर्भात जलसंपदा मंत्र्यांसोबत महापालिका व पाणीपुरवठा विभागाच्या अधिकार्यांची बैठक झाली. मात्र, मुळशी धरणातून पाणी देण्यास अद्याप प्रतिसाद मिळालेला नाही. पाण्याचे ऑडिट करून, गळती थांबण्याच्या सूचना त्यांनी महापालिकेस केल्या आहेत.